पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

14 वर्ष वर्धापन दिन

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३४३ ■ सोमवार, दि.२२ जून २०२६ ■ मुल्य 5 रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.-MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# महायुतीचा 16 जागांवर विजय, महाविकास साफ

## नाशिकमध्ये बंडखोर गोकुळ गितेंचा शिंदेसेनेला धक्का

प्रतिनिधी २२ जून

**विधान परिषद निवडणूक निकाल**

**मुंबई** महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेच्या १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीचा संपूर्ण निकाल अखेर जाहीर झाला आहे. १८ जून रोजी पार पडलेल्या या निवडणुकीत महायुतीने आपला वरचष्मा कायम राखत १७ पैकी तब्बल १६ जागांवर दणदणीत विजय मिळवला आहे. मात्र,



गोकूळ गिते



प्रविण पोटे

नाशिकच्या जागेवर महायुतीला मोठा धक्का बसला असून, तिथे अपक्ष उमेदवार (भाजप बंडखोर) गोकुळ गिते यांनी महायुती आणि शिवसेना शिंदे गटाचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव केलाय. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला आहे. या निवडणुकीची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे, प्रत्यक्ष मतदानापूर्वीच १७ पैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. त्यामुळे रविवारी उर्वरित ११ जागांसाठी मतमोजणी प्रक्रिया पार पडली. या ११ पैकी १० जागांवर महायुतीने निर्विवाद वर्चस्व मिळवले, तर एका जागेवर बंडखोराने महायुतीचे गणित बिघडवले.

### विधान परिषदेच्या ११ जागांचा निकाल

- अमरावती- प्रवीण पोटे, भाजप
- नाशिक- गोकुळ गिते, (अपक्ष) भाजपचे बंडखोर उमेदवार
- छत्रपती संभाजीनगर-जालना- सुहास शिरसाट- भाजप
- जळगाव- नंदकिशोर महाजन, भाजप
- नांदेड- अमर राजूरकर, भाजप
- सोलापूर- राजेंद्र राऊत, भाजप
- भंडारा- गोंदिया- अविनाश ब्राह्मणकर, भाजप
- सांगली- सातारा- धैर्यशील कदम, भाजप
- धाराशिव-लातूर- बीड- बसवराज पाटील, भाजप
- नागपूर- राजीव पोतदार, भाजप
- परभणी- हिंगोली- सईद खान, शिवसेना

### महायुतीचे ६ बिनविरोध निवडून आलेले उमेदवार

- ठाणे - रवींद्र फाटक - शिवसेना
- यवतमाळ - दुष्यंत चतुर्वेदी - शिवसेना
- रायगड - रत्नागिरी - सिंधुदुर्ग - अनिकेत तटकरे - राष्ट्रवादी काँग्रेस
- पुणे - विक्रम काकडे - राष्ट्रवादी काँग्रेस
- वर्धा - गडचिरोली - चंद्रपूर - अरुण लखाणी - भाजप
- अहिल्यानगर - प्राजक्त तनपुरे - भाजप

### कृष्णा नागेश पाटील आष्टीकर यांची ठाकरे गटातून हकालपट्टी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने पक्षविरोधी कारवायांबाबत कठोर भूमिका घेत कृष्णा नागेश पाटील आष्टीकर यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. यासंदर्भात खासदार संजय राऊत यांनी सोशल मीडियावर माहिती देत, 'कृष्णा नागेश पाटील (आष्टीकर) यांची पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे,' असे म्हटले आहे.

## वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता; तापमानात होणार घट

**अकोला:** प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर कडून जाहीर करण्यात आलेल्या ताज्या साप्ताहिकाच्या अंदाजानुसार अकोला आणि परिसरात आगामी आठवडाभरात सातत्याने वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २३ जूनपासून तापमानातही लक्षणीय घट होणार असल्याने नागरिकांना कडक उन्हापासून काहीसा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. हवामान केंद्राने २१ जून ते २७ जून २०२६ या कालावधीसाठी वर्तवलेला सविस्तर दैनंदिन अंदाज नुसार सोमवारी दुपारनंतर किंवा संध्याकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस किंवा मेघगर्जनेची दाट शक्यता आहे.






## भाजपाचे प्रवीण पोटे यांची विजयी हॅटट्रिक

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती :** विधान परिषदेचे महायुतीचे भाजपाचे उमेदवार प्रवीण पोटे यांनी तिसऱ्यांदा निवडून येण्याचा विक्रम केला आहे.

त्यांना तब्बल ३९० मते मिळाली. महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार हर्षेजित देशमुख यांना खातेही उघडता आले नसल्याची त्यांच्यावर नामूसकी आली. तर वंचित बहुजन आघाडीचे डॉक्टर निलेश



विश्वकर्मा यांना ३१ मते मिळाली. बोटावर मोजण्याइतके वंचित बहुजन आघाडीचे नगर नगरसेवक असतानाही त्यांना ३१ मते मिळाल्याने काँग्रेसचे मते फुटून त्यांना फायदा झाला सही बोलल्या जात आहे. दुसरीकडे अनेक नगरसेवकांचे काँग्रेसचे मते भाजपाच्या कोट्यात गेली आहेत. सकाळपासूनच जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात मतमोजणीला सुरुवात झाली.

पावसाळी अधिवेशनाचा पहिला दिवस

## विधान भवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांचे आंदोलन...!

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई:** विधान भवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांनी शेतकरी कर्जमाफीसाठी आंदोलन केले. महाराष्ट्र विधिमंडळाच्या सन २०२६च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाला आजपासून विधानभवन, मुंबई येथे सुरुवात झाली. पहिल्या दिवसाचे कामकाज 'वंदे मातरम' आणि 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने सुरू झाले.सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीलाच नुकत्याच निवडून आलेल्या दोन नवनिर्वाचित सदस्यांना विधानसभा अध्यक्षांनी सदस्यत्वाची शपथ दिली. या आमदारांमध्ये बारामती श्रीमती सुनेत्रा अजित पवार आणि राहूरी चे अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना शपथ दिली.शोक प्रस्तावाकडे वळण्यापूर्वीच विरोधी पक्षातील नेते नाना पटोले यांनी राज्यातील भीषण दुष्काळाचा आणि पाणीटंचाईचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला.

## भीषण अपघातात अकोटच्या दोन युवकांचा मृत्यू

प्रतिनिधी २२ जून

**हातरूण :** उरळ पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या ग्राम अंदुरा पानखास जवळ पुलावर रविवारी दुपारी दुचाकी आणि एसटी बसचा भीषण अपघात झाला. यात अकोट शहरातील दोन युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. प्राप्त माहितीनुसार कुणाल राजेश भोरे ३२ व श्रीकांत करुषोत्तम बायस्कर ३० हे दोघे दुचाकी क्र. एमएच ३० बीई ७९७द ने शेगावहून अकोटकडे येत होते. त्यावेळी अंदुरा पानखास जवळ दुचाकी चालकाचे नियंत्रण







सुटल्याने समोरून येणाऱ्या एसटी बस एमएच १४ एमटी ०२५३ ला धडकली. त्यामुळे दोघेही जागीच ठार झाले. चांदुर बाजार आगाराची बस कोट शेगाव मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे जात होती. अपघात इतका भीषण होता की कुणाल मोरे आणि हर्षल बायसकर या दोन्ही युवकांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत महत कार्य केले. त्यानंतर उरळ पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविले. उरळ पोलिस तपास करीत आहेत.




# राजकारण, संघटना आणि तरुणांचे भविष्य

१८ ते २५ वर्षे हा प्रत्येक तरुणाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक कालखंड असतो. याच वयात व्यक्ती शिक्षण, करिअर, सामाजिक संबंध, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या दिशेने वाटचाल करतो. परंतु याच काळात चुकीच्या संगतीमुळे, अविचारी निर्णयांमुळे किंवा दिशाहीनतेमुळे अनेक तरुणांचे आयुष्य भरकटते. काही तरुण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सकारात्मक योगदान देतात, तर काही व्यसनाधीनता, गुन्हेगारी किंवा इतर गैरप्रकारांच्या विळख्यात अडकतात. महाविद्यालयीन जीवनात किंवा युवक अवस्थेत अनेक तरुण विविध सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय संघटनांशी जोडले जातात. या माध्यमातून नेतृत्वगुण, संवादकौशल्य, समाजसेवेची भावना आणि संघटन कौशल्य विकसित होऊ शकते. मात्र अंधानुकरण, गटबाजी किंवा आक्रमक विचारसरणीचा प्रभाव पडल्यास त्याचे दुष्परिणामही होऊ शकतात.

## 18 ते 25 वर्षाचा प्रवास

मित्रपरिवाराचा प्रभाव, तणाव, उत्सुकता किंवा चुकीची जीवनशैली यांमुळे काही तरुण मद्यपान, तंबाखू, गुटखा, अमली पदार्थ यांसारख्या व्यसनांकडे वळतात. व्यसनामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते तसेच शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीलाही मोठा फटका बसतो.अनेक युवक स्वयंसेवी संस्था, सामाजिक उपक्रम, पर्यावरण संवर्धन, रक्तदान, आपत्ती व्यवस्थापन अशा क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करतात. अशा तरुणांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतो आणि त्यांचे व्यक्तिमत्त्वही अधिक सक्षम बनते.काही वेळा राजकीय किंवा सामाजिक गटांमधील वाद, मारामाऱ्या, सोशल मीडियावरील गैरवर्तन किंवा बेकायदेशीर कृत्यांमुळे तरुणांवर गुन्हे दाखल होतात.ज्यांचे गंभीर परिणाम त्यांना तात्काळ जाणवत नाही. गुन्हा दाखल होणे ही केवळ कायदेशीर बाब नसून ती व्यक्तीच्या संपूर्ण भविष्यावर परिणाम करणारी घटना ठरू शकते. शासकीय नोकऱ्या, पोलीस भरती, सैन्य भरती, स्पर्धा परीक्षा, परदेशी शिक्षण किंवा अनेक खाजगी क्षेत्रातील संधी मिळवताना अशा नोंदी अडथळा ठरू शकतात. काही क्षणांच्या चुकीच्या निर्णयाची किंमत अनेक वर्षे मोजावी लागू शकते. याहूनही अधिक वेदनादायक बाब म्हणजे या परिस्थितीचा परिणाम कुटुंबावर होतो. मुलाच्या भविष्याची स्वप्ने पाहणारे आई-वडील मानसिक तणावाखाली जातात. समाजातील चर्चा, न्यायालयीन प्रक्रिया, आर्थिक खर्च आणि मुलाच्या भवितव्याची चिंता यामुळे संपूर्ण कुटुंब अस्वस्थ होते. ज्यांनी आयुष्यभर मुलासाठी कष्ट घेतले, त्यांनाच त्याच्या चुकीच्या निर्णयांचे परिणाम भोगावे लागतात.म्हणूनच तरुणांनी कोणत्याही कृतीत सहभागी होण्यापूर्वी तिचे कायदेशीर, सामाजिक आणि व्यावसायिक परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. क्षणिक आवेशापेक्षा विवेक, जबाबदारी आणि दूरदृष्टी यांना महत्त्व दिल्यास स्वतःचे करिअर आणि कुटुंबाचा सन्मान दोन्ही जपता येऊ शकतात.

१८ ते २५ वर्षे हे आयुष्याला आकार देणारे वय आहे. या काळात घेतलेले निर्णय, निवडलेली संगत आणि स्वीकारलेली मूल्ये भविष्यातील यश-अपयश निश्चित करतात. सामाजिक व राजकीय क्षेत्रात सहभाग घेणे चुकीचे नाही, परंतु त्यासोबत शिक्षण, करिअर, नैतिकता आणि कायद्याचे भान ठेवणे आवश्यक आहे. तरुणांनी क्षणिक आकर्षणापेक्षा दीर्घकालीन उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले, तर ते स्वतःचे आणि समाजाचेही भविष्य उज्ज्वल करू शकतील.

**कु.उर्वशी मनिष संघवी**
**रा.मुर्तिजापूर,जि.अकोला**

## राजाच्या विरोधात काजींचा निकाल

एकदा हजरत अली हे त्या काळातील खलिफा (राजा) होते. त्यांचे एक सुरक्षा कवच हरवले. काही दिवसांनी त्यांनी ते कवच एका यहुदीकडे पाहिले. हजरत अली यांनी त्याला सांगितले, 'हे कवच माझे आहे.' परंतु यहुदी म्हणाला, 'नाही, हे माझेच आहे.'

वाद वाढल्यावर हजरत अली म्हणाले, 'जर तू माझा दावा मानत नसशील, तर आपण काजींच्या न्यायालयात जाऊ.' दोघेही काजींच्या न्यायालयात गेले. काजींनी हजरत अली यांना पुरावा सादर करण्यास सांगितले. हजरत अली यांनी आपल्या कंबर नावाच्या गुलामाला (नोकराला) साक्षीदार म्हणून हजर केले. त्याने साक्ष दिली की ते सुरक्षा कवच हजरत अली यांचेच आहे. त्यानंतर हजरत अली यांनी आपले दोन पुत्र, हसन व हुसेन, यांनाही साक्षीसाठी हजर केले. त्यांनीही आपल्या वडिलांच्या बाजूने साक्ष दिली. काजी म्हणाले, 'मी तुमच्या नोकराची साक्ष मान्य करतो; परंतु इस्लामी कायद्यानुसार तुमच्या मुलांची साक्ष या प्रकरणात ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे आणखी एक स्वतंत्र साक्षीदार आवश्यक आहे.' हजरत अली दुसरा साक्षीदार सादर करू शकले नाहीत. म्हणून काजींनी इस्लामी शरीयत कायद्यानुसार हजरत अली यांच्या विरोधात निकाल देऊन ते सुरक्षा कवच त्या यहुदीच्या ताब्यात ठेवण्याचा निर्णय दिला. हे पाहून यहुदी आश्चर्यचकित झाला. एका मुस्लिम राजाला न्यायालयात उभे केले गेले आणि न्यायाधीशाने राजाच्या विरोधात निकाल दिला, तरीही राजाने तो शांतपणे स्वीकारला. तेव्हा यहुदीने हजरत अली यांच्याकडे पाहून म्हटले, 'खरे तर हे सुरक्षा कवच तुमचेच आहे. मला ते अमुक ठिकाणी सापडले होते. आता तुम्ही ते परत घ्या. खरोखरच तुमचा धर्म न्यायप्रिय आहे. ज्या धर्मात राजाच्या विरोधातही न्याय दिला जातो, तो धर्म निश्चितच सत्य आहे. मी त्याचा आदर करतो आणि आजपासून इस्लाम धर्म स्वीकारतो.' हजरत अली यांनी ते सुरक्षा कवच आणि आपला घोडाही त्या यहुदीला भेट म्हणून दिला.

**(इद्रीस खान)**
**मो. नं. ९४२२१९२९५४**

# निरोगी वृद्धत्वासाठी योग

२०२६ च्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाची 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' ही मध्यवर्ती संकल्पना. आपल्याकडे '१०० वर्षांहून अधिक काळ जगले', असा उल्लेख असलेल्या योग्यांची उदाहरणे या ना त्या कारणाने समोर येतात. उदाहरणार्थ योगी चांगदेव, योगी लाहिरी महाशय इत्यादी. आपल्याकडे जुन्या ग्रंथांमध्ये अशी आणखीही उदाहरणे आहेत. वैज्ञानिक दृष्टीने हे शक्य नाही, अशीही सामान्य धारणा असते. या पार्श्वभूमीवर 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' खरेच कितपत शक्य आहे ? वयोवृद्ध लोक खरोखरच योग करू शकतात का ? या कल्पनेला काही वैज्ञानिक आधार आहे का ?, असे प्रश?न काहींना पडतील. या प्रश?नांची उत्तरे आपण या लेखातून पहाणार आहोत.



### वृद्ध लोक कितपत योग करू शकतात ?

योग करायचे, तर त्यात पुष्कळ आसने करावी लागतात, ती कठीण असतात इत्यादी प्रकारच्या समजुतींमुळे हा प्रश्न असतो. वास्तवात तसे नाही. वय, तसेच व्याधीनुसार करण्यायोग्य अनुरूप आसने उपलब्ध आहेत आणि दुसरे, म्हणजे प्रत्यक्ष नियमितपणे आसने करू लागल्यानंतर स्वतःलाच जे सकृतदर्शनी कठीण वाटत होते, तसे ते कठीण नव्हते, हे स्पष्ट होते. अर्थात् वृद्धांनी योग करतांना तज्ञांचा सल्ला घ्यावा. निरोगी वृद्धत्व यांत वृद्धत्वाची लक्षणे न्यूनतम असणे, म्हणजे निरोगीपणा हे अनुस्यूत आहे.

### वृद्धत्वाची लक्षणे

वय वाढते तशी इंद्रियांची क्षमता न्यून होत जाते. त्यामुळे काही लक्षणे दिसू लागतात. उदाहरणार्थ केस गळणे, त्वचेला सुरकुत्या पडणे, विसरणे, पचनक्षमता न्यून होणे, हालचाली मंद होणे, त्या कठीण होणे, पूर्वीसारखे वजन उचलायला न जमणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात. याचे कारण, म्हणजे संबंधित इंद्रियांच्या मेलेल्या पेशींमुळे झालेली हानी पूर्ववत् भरून निघत नसते. हे अधिक समजण्यासाठी पुढचे सूत्र वाचावे.

### पेशींच्या स्तरावरील वृद्धत्व

मनुष्य देह हा विविध प्रकारच्या कोट्यवधी पेशींनी बनलेला असतो. पेशी जितक्या चांगल्या रितीने कार्यरत असतील, तेवढे त्या त्या इंद्रियाचे कार्य चांगले रहाते. यासाठी बहुतांश इंद्रियांमध्ये जुन्या पेशी मृत होऊन त्यांची जागा त्याच प्रकारच्या नवीन पेशींनी घेणे, ही प्रक्रिया अव्याहत चालू असते. उदाहरणार्थ तरुणपणामध्ये प्रत्येक २ ते ४ आठवड्यांनी (अनुमाने १४ ते २८ दिवस) त्वचेच्या पेशी पूर्णपणे पालटल्या जातात. प्रत्येक १ आठवड्यापेक्षाही न्यून वेळात (अनुमाने ३ ते ५ दिवसांत) पचनसंस्थेच्या (विशेषतः लहान आणि मोठ्या आतड्याच्या) आतील आवरणाच्या पेशी पूर्णपणे पालटल्या जातात. प्रत्येक पेशी ५० ते ७० वेळा विभाजित होऊ शकत असते. जीवनात होत असलेले मधुमेहादी विविध प्रकारचे आजार, धूम्रपान, तंबाखू आदी चुकीच्या सवयी आणि मानसिक तणाव, अशा विविध कारणांमुळे देहावर ताण येत असतो.

हा ताण 'डी.एन्.ए.'च्या कार्यावर परिणाम करतो. 'डी.एन्.ए.' नादुरुस्त झाला की, पेशी मरतात. मग त्या इंद्रियांची क्षमता न्यून होते. यातून जुन्या पेशींची जागा घेणाऱ्या नवीन पेशी उत्तम रितीने सिद्ध होत रहाणे किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात येईल. वृद्धत्वामध्ये नवीन पेशी सिद्ध होणे, ही प्रक्रिया हळू होत जाते. हे का होते ?

देहली येथील 'अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान' (एम्स) येथे वर्ष २०१७ मध्ये ९६ व्यक्तींवर सलग १२ आठवडे प्रयोग करण्यात आले. या व्यक्तींनी प्रतिदिन नियमितपणे प्रार्थना, 'वॉर्मअप' (प्रारंभीचे व्यायाम), विविध योगासने, प्राणायाम, ध्यान, ओंकार ध्वनी आणि शांतीमंत्र असे ठरवून दिलेले सत्र केले. संशोधनातून स्पष्ट झालेले परिणाम : या प्रयोगातून नियमित योग केल्यास मानवी शरिराला विविध प्रकारे लाभ होतात आणि त्यातून 'निरोगी वृद्धत्वाकडे जायची गुरुकिल्ली - योग' हे दिसून आले.

अ. 'अमरत्व रसायनात' वाढ : प्रयोगात सहभागी व्यक्तींच्या रक्तातील 'टेलोमरेझ' (ऊत्दर्सी) 'एन्झाईम'ची पातळी लक्षणीयरित्या वाढली. या वाढलेल्या 'टेलोमरेझ'ने 'टेलोमियर्स'ची डागडुजी तत्परतेने केली आणि त्यांची लांबी सुरक्षित ठेवली, म्हणजेच योगाने शरिराचे जैविक घड्याळ एकप्रकारे उलट फिरवण्यासारखे ('निर्गुह) काम पेशींच्या पातळीवर केले.

आ. अन्य रसायनांतील लाभकारी पालट : जीवनातील ताणामुळे शरिरात सिद्ध होणाऱ्या पेशींची हानी करणाऱ्या रसायनांत घट झाली. मेंदूला प्राणवायूचा पुरवठा वाढला. मेंदूतील रक्तवाहिन्या निरोगी राखण्यात साहाय्य झाले. मेंदूच्या पेशींच्या आरोग्यासाठी आवश्यक रसायनांमध्ये (हे जणू मेंदूच्या पेशींसाठी खत असते) वाढ झाली. जैविक घड्याळ आणि अमरत्वाचे रसायन पेशींमध्ये गुणसूत्रे (क्रोमोसोम) असतात. त्यांच्यावर त्या त्या पेशीचे कार्य अवलंबून असते. प्रत्येक गुणसूत्रामध्ये 'डी.एन्.ए.' असतात. एका पेशीपासून नवीन पेशी सिद्ध होणे, यासाठी माता पेशीतील गुणसूत्रांतील 'डी.एन्.ए.'ची प्रत कन्या पेशीमध्ये जशीच्या तशी सिद्ध केली जात असते. 'डी.एन्.ए.'वर कोणताही आघात होऊ नये, यासाठी गुणसूत्रांच्या चारही टोकांना ४ संरक्षक टोप्या असतात. ज्यांना 'टेलोमियर्स' म्हणतात. नवीन पेशीसाठी 'डी.एन्.ए.'ची नवीन प्रत सिद्ध होतांना या 'टेलोमियर्स'ची हानी होऊन ती आखूड बनत जातात. 'टेलोमियर्स'ची दुरुस्ती करून त्यांना पूर्ववत् करायचे कार्य 'टेलोमरेज' नावाचे रसायन करत असते. हे आपल्या शरिरात नैसर्गिकरित्या सिद्ध होते. जर रक्तातील 'टेलोमरेझ'ची मात्रा चांगली असेल, तर 'टेलोमियर्स' लहान होण्याचा वेग मंदावतो. परिणामी नवीन पेशी सहज सिद्ध होऊन त्या दीर्घकाळ कार्यरत रहातात. सामान्यतः वयानुसार शरिरातील 'टेलोमरेझ एन्झाईम'चे प्रमाण न्यून होत जाते आणि त्यामुळे स्वाभाविक 'टेलोमियर्स'ची दुरुस्ती प्रक्रिया अकार्यक्षम बनत ती आखूड होत जातात. एका मर्यादेच्या पुढे 'टेलोमियर्स' आखूड झाल्यानंतर त्या पेशीची नवीन पेशी निर्माण करायची क्षमता संपते. ती पेशीही मरून जाते. मग पुढील दुष्टचक्र गती घेते. इंद्रिये वेगाने अकार्यक्षम बनत जातात. थोडक्यात 'टेलोमियर्स' हे गुणसूत्रांचे आयुष्य मोजणारे जैविक घड्याळ, तर 'टेलोमरेझ' त्या घड्याळाची झीज रोखणारी चावी (अमरत्वाचे रसायन) आहे ! योगामुळे नेमक्या याच प्रक्रियेवर सकारात्मक प्रभाव पडतो. टेलोमियर्सनी (पांढरे) टोके झाकलेली मानवी गुणसूत्रे (राखाडी)

### निष्कर्ष

वृद्धत्वामध्ये होणारी मेंदू आणि शरीर यांची झीज नैसर्गिक असली, तरी योग हा ती झीज रोखणारा अन् शरिराला गुणसूत्रांच्या पातळीवर तरुण ठेवणारा एक प्रभावी वैज्ञानिक मार्ग आहे. योग प्रत्येकाने करावा, जो करील त्याने तो नियमितपणे करावयासाठी हा लेखन प्रपंच ! त्यामुळे तरुणांनी वृद्धत्व शक्य तितके पुढे ढकलण्यासाठी आणि वृद्धांनी वय वाढले असूनही क्षमता शक्य तितकी राखण्यासाठी अर्थात् निरोगीपणासाठी तरी योग नियमित करावा. यामुळे मानवी जीवनाचे ध्येय, म्हणजे स्वतःची आध्यात्मिक उन्नती करणे, हे योगाचे मूळ उद्दिष्ट साध्य करणे अधिक सोपे बनते; मग त्यासाठीही प्रयत्न करावेत.'

**डॉ. दुर्गेश सामंत, गोवा**

# पर्यावरण संरक्षण: काळाची गरज

'वसुधैव कुटुम्बकम' आणि निसर्गाला देव मानणारी आपली संस्कृती आहे. परंतु, आजच्या आधुनिक आणि औद्योगिक युगात मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी निसर्गाचा मोठ्या प्रमाणावर ओरबाडा केला आहे. आज प्रदूषण, जागतिक तापमानवाढ आणि ऋतूचक्राचा बिघाड यांसारख्या गंभीर समस्या आपल्यासमोर उभ्या ठाकल्या आहेत. म्हणूनच, पर्यावरण संरक्षण ही आज केवळ एक घोषणा नसून ती आपल्या अस्तित्वाची लढाई झाली आहे.

**पर्यावरण ऱ्हासाची मुख्य कारणे**

आपल्या पर्यावरणाचा समतोल बिघडण्यामागे प्रामुख्याने मानवी हस्तक्षेप कारणीभूत आहे :

सिमेंटची जंगले उभारण्यासाठी आणि औद्योगिकीकरणासाठी लाखो झाडे दररोज तोडली जात आहेत.

कारखाने आणि वाहनांमधून निघणारा धूर, रासायनिक सांडपाणी यामुळे हवा, जल आणि भूमी प्रदूषणाचा भस्मासूर वाढला आहे. विघटन न होणाऱ्या प्लॅस्टिकमुळे कचऱ्याचे ढीग साचत असून जलचर आणि प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे.



नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर: पाणी, खनिज तेल आणि कोळसा यांसारख्या मर्यादित संसाधनांचा अनिर्बंध वापर केला जात आहे.

पर्यावरण वाचवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करणे गरजेचे आहे. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे आपले छोटेसे पाऊलही मोठे परिवर्तन घडवून आणू शकते. वृक्षारोपण प्रत्येक व्यक्तीने वर्षाला किमान एक झाड लावून ते जगवले पाहिजे. झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून आपल्याला ऑक्सिजन देतात.

पाण्याची बचत पाण्याचा अपव्यय टाळणे, रेन वॉटर हार्वेस्टिंग (जमीनदोस्त पाणी साठवण) पद्धत वापरणे. प्लॅस्टिक बंदी प्लॅस्टिक पिशव्यांऐवजी कापडी किंवा ज्यूटच्या पिशव्यांचा वापर करणे.

ऊर्जा बचत गरज नसताना दिवे-पंखे बंद करणे, प्रवासासाठी सार्वजनिक वाहनांचा किंवा सायकलचा वापर करणे. पर्यावरण रक्षणासाठी नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे:

कचरा निर्माण करणाऱ्या वस्तूंचा वापर कमी करणे. एकाच वस्तूचा वेगवेगळ्या कामांसाठी पुन्हा पुन्हा वापर करणे. जुन्या कचऱ्यापासून (उदा. कागद, काच, प्लास्टिक) नवीन वस्तू तयार करणे.

'निसर्ग माणसाची गरज पूर्ण करू शकतो, पण त्याचा हावरेपणा नाही.' - महात्मा गांधी

निसर्ग आहे तर आपण आहोत, हे मानवाने आता समजून घेण्याची वेळ आली आहे. येणाऱ्या पिढीला जर आपल्याला शुद्ध हवा, शुद्ध पाणी आणि निरोगी आयुष्य द्यायचे असेल, तर आजच पर्यावरण संरक्षणाची शपथ घ्यावी लागेल. ५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून फक्त एक दिवस साजरा न करता, वर्षाचे ३६५ दिवस आपण निसर्गाशी कृतज्ञ राहून वागले पाहिजे.

## दिन विशेष
## जागतिक पर्जन्यवन दिन



जागतिक पर्जन्यवन दिन महत्त्वाचा आणि संवर्धनाचा संदेश देणारा हा दिवस आहे. जागतिक पर्जन्यवन दिन दरवर्षी २२ जून रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश पृथ्वीवरील पर्जन्यवनांचे (Rainforests) महत्त्व, त्यांची जैवविविधता आणि हवामानाचा समतोल राखण्यात त्यांची असलेली महत्त्वाची भूमिका याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे.

**इतिहास आणि सुरुवात**

या दिवसाची सुरुवात वर्ष २०१७ मध्ये 'रेनफॉरेस्ट पार्टनरशिप' (Rainforest Partnership) नावाच्या आंतरराष्ट्रीय बिगर-नफा (Non-profit) संस्थेद्वारे करण्यात आली होती. हवामान बदलाच्या गंभीर आव्हानांच्या काळात, उष्णकटिबंधीय पर्जन्यवनांचे रक्षण, संवर्धन आणि त्यांच्या पुनर्वाढ/पुनर्विकासासाठी लोक आणि संस्थांना एकत्र आणणे हे या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**पर्जन्यवने का महत्त्वाची आहेत?**

**हवामानाचा समतोल :** पर्जन्यवने मोठ्या प्रमाणावर कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ग्रीनहाऊस वायूंचा (Greenhouse gases) प्रभाव कमी करतात.

**जैवविविधता :** पृथ्वीवर आढळणाऱ्या वनस्पती आणि प्राण्यांच्या एकूण प्रजातींपैकी निम्म्याहून अधिक प्रजाती केवळ याच पर्जन्यवनांमध्ये राहतात.

**ऑक्सिजन आणि पाणी :** एकट्या ॲमेझॉनच्या पर्जन्यवनांमधून जगातील सुमारे २०टक्के ऑक्सिजनची निर्मिती होते.

**भारतातील महत्त्व :** भारतातील पर्जन्यवने (जसे की पश्चिम घाटातील जंगले) बाष्पोत्सर्जनाच्या (Evapotranspiration) माध्यमातून मान्सूनला गती व ऊर्जा देतात.

**सद्यसमोरील आव्हाने**

बेकायदेशीर जंगलतोड, शेतीचा विस्तार आणि अनिर्बंध विकास यांमुळे दर मिनिटाला सुमारे ४० फुटबॉल मैदानांच्या आकाराएवढी पर्जन्यवने नष्ट होत आहेत.

जागतिक पर्जन्यवन दिन आपल्याला आठवण करून देतो की, या परिसंस्थेचे (Ecosystem) रक्षण करणे केवळ निसर्गासाठीच नाही, तर मानवी अस्तित्वासाठीही अत्यंत आवश्यक आहे. पर्जन्यवनांचे महत्त्व, त्याचे संवर्धन आणि या दिवसाचे मूलभूत पैलू थोडक्यात समजून घेण्यासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे.

# माणुसकीचा वसा : डॉ. भास्करराव मुळे

तेल्हाऱ्याचे सुप्रसिद्ध आणि सुहृद डॉक्टर भास्करराव मुळे यांनी या जगाचा निरोप घेतला. गेल्या एक-दोन वर्षांपासून आजारपणामुळे ते मुंबईला आपल्या मुलाकडे राहत होते. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांच्या पार्थिवावर मूळ गावी, म्हणजेच तेल्हाऱ्यालाच अंत्यसंस्कार करण्यात आले. 'आपल्या मातीतच मला शेवटचा श्वास घेऊ द्या किंवा मी गेल्यानंतर तरी माझे अंत्यविधी तिथेच करा,' हा त्यांचा ध्यास अखेर पूर्ण झाला. आपली कर्मभूमी आणि तिथल्या माणसांशी असलेले त्यांचे नाते किती घट्ट होते, याचीच ही प्रचिती.

मुंबईला हितेशच्या आलिशान फ्लॅटमध्ये बसले असताना, शेवटच्या दिवसांत त्यांच्या तोंडी वारंवार एकच वाक्य असायचे की, मला एकदा तेल्हारा बघून येऊ द्या. खिडकीबाहेर उंचच उंच इमारती आणि खाली धावणारी गर्दी दिसायची; पण डॉक्टरसाहेबांच्या डोळ्यांत मात्र तेल्हाऱ्याचा तो धुळीचा रस्ता, दोन खोल्यांचा साधा दवाखाना आणि ओसरीवर बसलेली माणसं रूंजी घालत असायची. 'डॉक्टरसाहेब, जरा ऐका नाष्ठ' म्हणत मन मोकळं करणारे चेहरे त्यांना सारखे साद घालत होते. माणसाने या जगाचा निरोप घेण्याआधी एकदा तरी तिथं परत जावं, जिथं आपल्या हातून एखादा हात निसटला, एखादा क्षण साठला आणि एखादं आयुष्य उभं राहिलं. आज डॉक्टरसाहेब आपल्यात नसले तरी त्यांचा हा संपूर्ण प्रवास डोळ्यांसमोर उभा राहतोय.

तेल्हारा डॉक्टरसाहेबांची खऱ्या अर्थाने कर्मभूमी होती. साध्या दोन खोल्यांतून सुरू झालेली त्यांची प्रॅक्टिस पैशांपेक्षा विश्वासाच्या कमाईवर चालली. फी कमी आणि माणुसकी जास्त, हेच त्यांचे ब्रीद होते. कुणी शेतकरी, मजूर तर कुणी गरजू महिलाष्ठ 'डॉक्टर, तुमच्याशी बोललो की बरं वाटतं,' असे म्हणत लोक हक्काने त्यांच्याकडे यायचे. ते कधीही पैशांचा हट्ट धरत नसत. ते उपचार फक्त औषधांनी करत नव्हते, तर रुग्णाचे ऐकून, त्याला समजून घेऊन आणि मायेने हात धरून करत होते. त्यांनी आयुष्यभर फक्त रुग्ण नाही, तर माणसं कमावली. उपचार शरीरापेक्षा मनावर जास्त करायचे असतात, हे ओळखणारे ते उत्तम मानसशास्त्रज्ञ होते. कुणाच्या डोळ्यांत पाणी दिसले, तर कारण न विचारता फक्त त्याचा हात हातात घेऊन धीर देणे, ही त्यांची उपचारपद्धती होती.

सोनखाससारख्या छोट्याशा खेड्यात, ग्रामीण मातीत वाढलेल्या डॉक्टरसाहेबांनी कष्ट, संवेदना आणि सामान्य माणसाचे दुःख अगदी जवळून पाहिले. दहावीपर्यंतचे शिक्षण गावाकडे पूर्ण करून त्यांनी अकोल्याच्या राधाकिसन तोष्णीवाल आयुर्वेदिक महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण घेतले. शिक्षणानंतर भांबेरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांनी सेवेला प्रारंभ केला पण नोकरीपेक्षा थेट समाजात उतरून माणसांसाठी जगणे, हा त्यांचा खरा स्वभाव होता म्हणूनच नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी स्वतंत्र वैद्यकीय सेवा सुरू केली.

तेल्हाऱ्याला रसिक मित्र मंडळाची स्थापना करण्यात त्यांनी पुढाकार घेतला आणि विविध कार्यक्रमांची मेजवानी तेल्हारावासियांना दिली. यामध्ये प्रामुख्याने पंडित भीमसेन जोशी यांना तेल्हारा सारख्या छोट्या गावी आणून त्यांचा लाईव्ह कार्यक्रम घेण्यामध्ये डॉक्टरसाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. विविध शाळा महाविद्यालयांमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर आणि मार्गदर्शनपर अनेक भाषणे दिली.जेसिस क्लब ऑफ इंडिया तेल्हाऱ्यात स्थापन करून त्यांनी अनेक समाजोपयोगी उपक्रम आयोजित केले.

गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना तेल्हारा येथे करून त्यांचे राहत्या घरी दर गुरुवारी राष्ट्रसंतांची प्रार्थना आणि भजने ते आयोजित करीत असत. वैद्यकीय सेवा करीत असतानाच राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार तेल्हारा आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीत करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

तेल्हारा येथे पहिले रेसिडेन्शिअल लेआउट डॉक्टर साहेबांनीच वसविले आहे. कमर्शियल लेआउट टाकून बक्कळ पैसा कमावण्यापेक्षा गरजू व्यक्तींना माफक दरात घरे उपलब्ध व्हावीत हा त्या मागचा उद्देश होता. त्यांच्या या धाडसी निर्णयामुळेच त्यानंतर तेल्हारा येथे प्लान्ड लेआउट्स सुरू झाले. पैशाचा हव्यास न करता त्यांनी अनेक गरजूंना अत्यंत माफक दरात हे प्लॉट्स उपलब्ध करून दिले.

तेल्हारासारख्या गावातून अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाकडे वळविण्यात त्याचप्रमाणे स्किल्ड कोर्सेस पूर्ण करून व्यावसायिक क्षेत्रात उतरवण्यासाठी त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

काळ बदलला आणि आजाराने ग्रासल्यामुळे त्यांना मुंबईला मुलाकडे आणले गेले. मुलगा आणि सून दोघांनीही त्यांची खूप काळजी घेतली.तिथेही त्यांनी आपल्या स्वभावाने माणसे जोडली. त्यांच्या याच ओढीमुळे मुलाने फ्लॅटच्या परिसरात त्यांना एक छोटा दवाखाना थाटून दिला होता. तो उपचारासाठी नव्हता, तर संवादासाठी होता. तिथे आजूबाजूची माणसे यायची, मन मोकळे करायची आणि केवळ मन मोकळे करण्याची फी द्यायची. किती विलक्षण गोष्ट आहे ही! डॉक्टरसाहेब समोरच्याचे दुःख ऐकण्यासाठी आपले मन आणि हृदय सदैव उघडे ठेवायचे. त्यांचा मुलगा डॉ.हितेश आणि सून डॉ.नेहा मुंबईत डॉक्टर आहेत.मोठी मुलगी डॉ.वैशाली इंग्रजीत पीएच.डी.आहे व जावई डॉ. मनीष गायकवाड शिवाजी सायन्स कॉलेज येथे प्रोफेसर आहे. लहान मुलगी डॉ. निकिता नागपूरला नेत्रतज्ञ आहे व जावई डॉ. मनोज व्यवहारे हे पोट विकार तज्ञ आहेत ..त्यांच्या पत्नी रजनीताई मुळे तेल्हाऱ्याला नगराध्यक्ष होत्या. डॉक्टरसाहेबांनी नेहमीच त्यांच्या पंखांना आकाश दिले आणि कुटुंबातील प्रत्येकाला स्वतःची स्पेस दिली.



आज समाजात असं अजातशत्रू व्यक्तिमत्त्व दुर्मिळ असलं, तरी त्यांनी जपलेला माणुसकीचा हा वसा आणि वारसा पुढे चालत राहणे, हीच त्यांना खरी भावपूर्ण श्रद्धांजली!

**डॉक्टर साहेबांच्या पवित्र स्मृतींना आणि माणुसकीला विनम्र अभिवादन!**

**डॉ.लीना निकम, नागपूर**

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
सोमवार दि. २२ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# मंजूर रस्त्यावर अतिक्रमण : फ्रीडम शाळेला नगरपरिषदेचे बांधकाम हटविण्याची नोटीस

वि. प्रतिनिधी २२ जून




**अकोट :** अकोट नगरपरिषदेने शहरातील फ्रीडम शाळेच्या परिसरातील मंजूर अभिन्यासातील रस्त्यावर करण्यात आलेल्या कथित अतिक्रमणाबाबत कठोर भूमिका घेत संबंधितांना २४ तासांच्या आत अनधिकृत बांधकाम हटविण्याची नोटीस बजावली आहे.

नगरपरिषदेच्या नगररचना विभागाकडून जारी करण्यात आलेल्या नोटिशीनुसार, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३(१) व ५४ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. फ्रीडम शाळेचे संचालक मनोज बा. झाडे यांना पाठविण्यात आलेल्या नोटिशीत सं. नं. ०८, नझुल शीट क्रमांक १८ व नझुल प्लॉट क्रमांक २४ मधील मंजूर अभिन्यासातील ६ मीटर रुंद रस्त्यावर अतिरिक्त बांधकाम करून अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

नगरपरिषदेने संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे सांगत नोटीस प्राप्त झाल्यानंतर २४ तासांच्या आत अतिक्रमण काढून जमीन पूर्ववत स्थितीत आणावी तसेच अनधिकृत वापर तात्काळ थांबवावा, असे निर्देश दिले आहेत.

नोटिशीतील आदेशांचे पालन न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमातील कलम ५२ व ५३ नुसार संबंधितांविरुद्ध खटला दाखल करण्यात येईल. तसेच नगरपरिषदेमार्फत थेट अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येणार असून त्यासाठी होणारा खर्च व जबाबदारी संबंधितांवर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

मुख्याधिकारी शशिकांत मारोती बाबर यांनी ही नोटीस जारी केली असून अतिक्रमण निर्मूलन पथकाचे प्रमुख विजय भोंडे यांना पुढील कार्यवाहीसाठी प्रत पाठविण्यात आली आहे. नगरपरिषदेच्या या कारवाईमुळे शहरातील इतर अतिक्रमणधारकांमध्येही खळबळ उडाली आहे.

अतिक्रमण ही अकोट शहरात समस्या बनली आहे. काही व्यवसायीक प्रतिष्ठाने तसेच शाळांनी देखील अतिक्रमण केलेले दिसते. परंतु नगरपालिका प्रशासनाने या विरुद्ध पावले उचलली आहेत. संबंधिताना नोटीस बजावली आहे. स्वतःहून अतिक्रमण काढा अन्यथा नगरपालिकेला कारवाई करावी लागेल असा इशारा दिला आहे.

# आर.डी.जी. शार्क पूल सीझन-1 चा भव्य समारोप

प्रतिनिधी २२ जून




**अकोला :** येथील आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये २० जून रोजी आर.डी.जी. शार्क पूल सीझन-१ ची ग्रँड फायनल उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेला हा एक आगळावेगळा नवोन्मेष व उद्योजकता उपक्रम असून, १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांच्या कल्पक संकल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांना गुंतवणूकदारांशी जोडणे आणि त्यांच्या कल्पनांचे यशस्वी व्यवसायांमध्ये रूपांतर करण्यासाठी मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ मिळवून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

आज अनेक विद्यार्थ्यांकडे नाविन्यपूर्ण कल्पना, तांत्रिक कौशल्ये आणि समाजातील समस्यांवर प्रभावी उपाय असतात; मात्र अशा कल्पना सादर करण्यासाठी, त्यांना दिशा देण्यासाठी आणि आवश्यक निधी मिळवून देण्यासाठी योग्य व्यासपीठांची कमतरता जाणवते. ही दरी भरून काढण्यासाठी आर.डी.जी. पब्लिक स्कूलने शार्क पूलची संकल्पना साकारली. युवा नवोन्मेषकांच्या स्वप्नांना पंख देण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

पहिल्याच सीझनमध्ये या उपक्रमाला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेसाठी एकूण १४३ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून निवड झालेल्या १० स्पर्धकांनी ग्रँड फायनलमध्ये आपल्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. या युवा नवोन्मेषकांनी आपल्या कल्पकतेचे, व्यावसायिक दृष्टिकोनाचे आणि सादरीकरण कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करून उपस्थित परीक्षक व प्रेक्षकांची मने जिंकली.

## युवा नवोन्मेषकांना मिळाले नवे व्यासपीठ

अंतिम फेरीत विद्यार्थी वंशल अढाऊ याने सादर केलेल्या 'सेन्सोटेक – स्मार्ट कृषी व मृदा विश्लेषण प्रणाली' या प्रकल्पाने सर्व शार्क (उद्योजक व गुंतवणूकदार) यांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या अभिनव प्रकल्पाने प्रभावित होऊन सर्व शार्क त्याला सहकार्य व गुंतवणूक करण्यासाठी उत्सुकतेने पुढे आले. ही घोषणा होताच संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले अकोल्याचे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनीही वंशलला त्यांच्या स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या 'साथ ऑन टाइम' या प्रकल्पालाही विशेष दाद मिळाली. तसेच 'साजुक', जो प्रत्येक घराला क्लाऊड किचनमध्ये रूपांतरित करण्याची क्षमता ठेवतो, स्वयं चार्ज होणारे इलेक्ट्रिक वाहन, 'स्टडीमेट अल्ट्रा', जो शिक्षणाला खेळाचे स्वरूप देऊन विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरित करतो, 'ईटइको', जो शेतकरी आणि ग्राहकांना थेट जोडणारा सेंद्रिय उत्पादनांचा डिजिटल मंच आहे, तसेच 'अश्वा ड्युअल मोटर स्कूटर', जी पेट्रोल आणि इलेक्ट्रिक तंत्रज्ञानावर आधारित हायब्रिड स्कूटर आहे, अशा अनेक नाविन्यपूर्ण प्रकल्पांनी उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणांनी योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास शालेय विद्यार्थीही समाज आणि उद्योगक्षेत्रातील समस्यांवर प्रभावी उपाय सुचवू शकतात, हे सिद्ध करून दाखवले.

स्पर्धेचे परीक्षक व शार्क म्हणून उपस्थित शिवप्रकाश रुहाटीया, नितीन खंडेलवाल, निकेश गुप्ता, पंकज कोठारी, गुलशन कृपलानी, सोमेश बजाज आणि श्रीमती नताशा भसीन यांनी आर.डी.जी. पब्लिक स्कूलने उपलब्ध करून दिलेल्या या अभिनव व्यासपीठाचे मुक्तकंठाने कौतुक केले.

# लाल बहादूर शास्त्री विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

वि. प्रतिनिधी २२ जून

**अकोट :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अकोट येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयात विविध योगासनांचे प्रात्यक्षिक, प्राणायाम व ध्यान सत्र आयोजित करून योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लूणकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, प्राचार्य रामेश्वर पातोंडे आणि उपप्राचार्य नितीन गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. यावेळी क्रीडा प्रशिक्षक सुयोग कल्पेकर यांनी योगाचे महत्त्व व त्याचे आरोग्यदायी फायदे याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात शिक्षकांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन, त्रिकोणासन आणि पद्मासन आदी योगासनांचा सराव केला. तसेच प्राणायाम आणि ध्यानधारणेचेही सत्र घेण्यात आले.

नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहते, मन शांत होते तसेच एकाग्रता वाढण्यास मदत होते, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल चांदूरकर यांनी केले. समारोपप्रसंगी प्राचार्य रामेश्वर पातोंडे यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करत सर्वांनी नियमित योगाभ्यास करून निरोगी व संतुलित जीवनशैली अंगीकारावी, असे आवाहन केले.

# अकोल्यात पाच दिवसीय सनातन संस्कार प्रशिक्षण शिबिर

प्रतिनिधी २२ जून



**अकोला :** सध्याच्या आधुनिक युगात लहान मुलांवर योग्य संस्कार व्हावेत आणि त्यांना आपल्या समृद्ध संस्कृतीची ओळख व्हावी, या उद्देशाने ङसनातनङ ङसंस्थेच्याङ वतीने अकोला शहरातील केशव नगर भागातील जानोरकर मंगल कार्यालय आणि दाबकी रोडवरील राजेश्वर कॉन्व्हेंट येथे आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय 'सनातन संस्कार प्रशिक्षण शिबिरा'चा नुकताच उत्साहात समारोप झाला. या दोन्ही शिबिरांमध्ये बाल साधकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत झालेल्या या शिबिरांमध्ये लहान मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकासासाठी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत म्हणावयाचे श्लोक, आरोग्यासाठी विविध व्यायाम प्रकार, भारतातील थोर राष्ट्रीय पुरुष व संत यांचा दैदीप्यमान इतिहास, मंदिर आणि त्याचे महत्त्व, मंदिरात देवतांचे दर्शन घेण्याची योग्य पद्धत, मोठ्यांचा आदर कसा करावा, तसेच नमस्कार करण्याची शास्त्रोक्त पद्धत, यांसारख्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी प्रात्यक्षिकांसह शिकवण्यात आल्या.

**संस्कृती आणि विज्ञानाची सांगड! :** शिबिरामध्ये केवळ धार्मिकच नव्हे, तर मुलांच्या मनावर नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी बोधकथा सांगण्यात आल्या. तसेच कपाळावर टिळा लावण्याचे वैज्ञानिक व आध्यात्मिक महत्त्व, आध्यात्मिक दृष्टीने केक न कापता भारतीय पद्धतीने वाढदिवस कसा साजरा करावा, ऋषीमुनींनी लावलेले शोध आणि देवांशी आत्मनिवेदन कसे करावे (संवाद कसा साधावा) याविषयी अत्यंत सोप्या भाषेत मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी चित्रकला स्पर्धा आणि विविध आध्यात्मिक खेळही घेण्यात आले. विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा आणि अभ्यासाच्या माध्यमातून स्वतःचे गुणसंवर्धन कसे करावे, याचेही विशेष तंत्र या शिबिरात शिकवण्यात आले.

## बालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

# जागतिक योग दिनानिमित्त बसस्थानक क्रमांक २ वर योग शिबीर संपन्न



प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** योग हा

जागतिक योग दिनानिमित्त बसस्थानक क्रमांक २ वर योग शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीराचे आयोजन वाहतूक नियंत्रक सत्यनारायण नुतीवार यांनी केले. शिबीरामधे विविध आसनांचा सराव करण्यात आला. मार्गदर्शक म्हणून पतंजली जिल्हा प्रभारी डॉ. सुहास काटे, सहप्रभारी हरीशभाई पारवानी, डॉ. सुनीता कावळे, श्रीकांत चाळीसगावकर, अनिता नुतीवार, क्षितिजा वडी ऊपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी मीनाताई गणगणे वंदनाताई चिंचोळकर , कल्पना गायकवाड, शुभांगी ऊ,प्रणिता चव्हाण, कल्पना सोनोने, ममता जेरपोतवार, विशाखा राजे, चंद्रशेखर फुलझेले, आपोतीकर, जेष्ठ नागरिक संघ श्री रामभाऊ बिरकड, व ईतरही बरीच मंडळी उपस्थित होती.

# महानगरपालिकेत आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबीर संपन्न



प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महानगरपालिकेत योग गुरू अशोक पांडे यांच्या मार्गदर्शनात योग शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

योगशास्त्र ही भारतीयांची संपुर्ण जगाला दिलेली देणगी आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह, स्थूलपणा, थायराईड वृध्दी, मनोविकार, सांध्यांचे विकार तसेच सध्याच्या जीवनशैलीमुळे निर्माण झालेले अनेक आजार योग करण्यामुळे कमी किंवा संपुर्णपणे बरे होवू शकतात. योगाच्या दैनंदिन आचरणामुळे निरोगी राहण्यास व रोगमुक्त होण्यामध्ये मदत होते. यावेळी मनपा उपायुक्त दिलीप जाधव, महानगरपालिका सचिव अमोल डोईफोडे, कर अधिक्षक नंदीनी दामोदर, स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर, समाज कल्याण व विकास विभागाचे विभाग प्रमुख रंजना आंधळे, भांडार विभाग प्रमुख संतोष नायडू, एन.यू.एल.एम. विभागाचे शहर अभियान व्यवस्थापक संजय राजनकर, गणेश बिल्लेवार, सहा. अतिक्रमण निर्मुलन अधिकारी प्रवीण मिश्रा, पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता नरेश बावणे यांचेसह ईतर कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

वि. प्रतिनिधी २२ जून



**अकोट :** स्थानिक श्रीजी कॉलनी येथील सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये रविवारी (दि. २१ जून) आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने योगाभ्यास करून निरोगी जीवनाचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नवनीतजी लखोटिया होते. यावेळी उपाध्यक्ष लूणकरणजी डागा, सचिव प्रमोदजी चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, व्यवस्थापक प्रभुदास नाथे, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सुचिता गायकवाड व वैशाली गावत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

योग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची सुरुवात सूर्यनमस्काराने करण्यात आली. त्यानंतर ओम मंत्राचे सामूहिक उच्चारण करण्यात आले. सहभागी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी बालासन, वृक्षासन आदी विविध योगासने सादर केली. यावेळी दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व, नियमित योगाभ्यासामुळे होणारे शारीरिक व मानसिक फायदे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन अभिलाष काळमेघ, नारायण वानखेडे आणि सुजल काळबांडे यांनी केले. तर प्रणव देंडव यांनी आभार प्रदर्शन केले.

योग दिन कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता हास्यासनाने करण्यात आली. योगाच्या माध्यमातून निरोगी आणि संतुलित जीवन जगण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

# श्वासाने शरीराचे समतोल साधा : न्या. तेजवंतसिंघ संधू




प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** जीवनामध्ये श्वासाचे अत्यंत महत्व आहे. त्याच बरोबर निसर्गाचे संगोपण करणे आवश्यक आहे निसर्गाचा र्हीस थांबवने आवश्यक आहे. नाहीतर कलियुगात सर्व उलटे होत आहे. असे जिल्हा सत्र न्यायाधीश तेजवंतसिंघ संधू हे बोलत होते त्यावेळी त्यांनी गुरू ग्रंथा साहेब की बाणीचे वाचन केले.त्यावेळी ते भाऊक होऊन कोर्टातील केसचा उल्लेख केला.

शिवतेज प्रतिष्ठानचे कार्य खूप चांगले आहे म्हणून मी प्रथमच जाहीर कार्यक्रमासाठी आलो असे ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय योगदिनी नेहरू पार्क येथे सुरू असलेल्या योग शिबीरा करीता शिवतेज प्रतिष्ठानने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रास्ताविक योगगुरू मनोहर इंगळे यांनी करून संस्थेच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमास बी. एस. देशमुख, बंसलोचन मिश्रा, रामप्रकाश मिश्रा, गुरमीतसिंग गोसल उपस्थित होते.

# चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल

**हिवरखेड :** स्थानिक जयस्वाल कॉलनीतील पोलिस स्टेनच्या जवळ व कर्मचाऱ्यांच्या शेजारी असलेले रहिवाशी सारंगी गोपाल भगत यांच्या राहत्या घरी २० जूनच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी दरवाजे तोडून लाखो रुपयांचे सोन्याचे ऐवज लंपास केले.

**PUBLIC NOTICE DECLARATION**

It is hereby informed to the general public that **RAHIM KHAN UMER KHAN** and **RAHIM KHAN UMAR KHAN** are the names of one and the same living person. The spelling "Umer" and "**Umar**" refer to the same individual. In all my future legal, financial, and official documents, my name will be recognized and used as **RAHIM KHAN UMAR KHAN**

-: Address:-
**RAHIM KHAN UMAR KHAN**
Mullani Chouk, Khadan, Akola
Contact: 9822225598

# अकोट फाईल मध्ये अण्णाभाऊ साठे परिसरात दोन गटात दगडफेक





प्रतिनिधी २२ जून

## ◆ परिसरात तणावपूर्ण शांतता

**अकोला :** अकोट फाईल मध्ये दानिश आणि विशाल यांच्यात आज संध्याकाळच्या सुमारास कबुतर उडवण्यावरून वाद झाला होता. रात्री ११:०० वाजताच्या सुमारास दोन्ही गटात पुन्हा एकदा वाद झाला. यावेळी दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर जोरदार दगडफेक करण्यात आली, ज्यामुळे परिसरात काही काळ प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही गटातील आठ जणांना अटक केल्याचे कळते. वरिष्ठ पोलीस अधिकारी, आरसीपीचे जवान आणि शहरातील सर्व ठाणेदार घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. दगडफेक करणाऱ्या काही जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सध्याची परिस्थिती पाहता परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, परिसरात सध्या तणावपूर्ण शांतता आहे असे शहर एसडीपीओ सुदर्शन पाटील यांनी सांगितले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226

**मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**

**गायत्री नगर, अकोला**

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

**इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.**
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

**वैशिष्ट्ये :**
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा



पत्ता : मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २२ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## फेस ई-केवायसी न केल्याने शेकडो शेतकऱ्यांवर गंडांतर

प्रतिनिधी २२ जून

**यवतमाळ** : वार्षिक फेस ई-केवायसी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात २३ वा हप्ता जमा केला जाणार होता. जिल्ह्यातील दोन लाख ९० हजार शेतकरी लाभार्थ्यांना 'प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी' योजनेच्या माध्यमातून वर्षाला सहा हजार रुपये जमा केले जातात.

मात्र, त्यासाठी आता दरवर्षी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यासाठी ३० जूनपर्यंत प्रत्येक शेतकऱ्याला नोंदणी बंधनकारक आहे. असे असतानाही अनेक शेतकऱ्यांनी ई-केवायसी न केल्याने अनेकांच्या खात्यात पैसेच वळते झाले नाहीत.

पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २३ व्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. त्यासाठी फेस ई-केवायसी बंधनकारक होती.

अनेकांना ही फेस ई-केवायसी कशी करायची, याची माहितीच नसल्याने अनेकांनी ही फेस ई-केवायसी केलीच नाही. यातून २३ वा हप्ता रखडला आहे.

# काँग्रेसची जिल्हा बैठक; कर्जमाफी, पिकविमा व बॅलेट पेपर मतदानाचे ठराव

### उभाठा फुटीचे सूत्रधार संजय देशमुख; जनतेचा विश्वासघात केला - प्रतिभा धानोरकर

### भविष्यात लोकाभिमुख मुद्द्यांवर काँग्रेसचा भर - अॅड. सचिन नाईक

प्रतिनिधी २२ जून



**यवतमाळ** : जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीची बैठक रविवारी शहरातील मिडटाउन हॉटेल येथे जिल्हाध्यक्ष अॅड. सचिन नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत शेतकरी, शिक्षण, महिला सुरक्षा व लोकशाही व्यवस्थेशी संबंधित विविध विषयांवर महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनबांधणीचा आराखडाही निश्चित करण्यात आला.

बैठकीत राज्य सरकारने सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, पिकविम्याची रक्कम तत्काळ वितरित करावी, खत व बियाण्यांतील भेसळ रोखण्यासाठी कठोर कारवाई करावी आणि दुबार पेरणीसाठी अनुदान द्यावे, असा ठराव मंजूर करण्यात आला. नीटसह विविध परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा किंवा त्यांना पदावरून हटवावे, अशीही मागणी करण्यात आली.

महाविकास आघाडीचे खासदार संजय देशमुख व नागेश पाटील आष्टीकर यांनी पक्षांतर करून जनतेचा व आघाडीचा विश्वासघात केल्याचा आरोप करत त्यांच्या कृतीचा निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच राजकीय पक्षांमध्ये फोडाफोडी करून लोकशाही कमकुवत करण्याचे काम केंद्र व राज्य सरकार करीत असल्याचा आरोप करत त्याचाही निषेध नोंदविण्यात आला. आगामी सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी तसेच जिल्ह्यात महिलांवरील वाढत्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत, असेही ठराव बैठकीत मंजूर करण्यात आले.

बैठकीत प्रत्येक १५ दिवसांनी जनता दरबार घेणे, काँग्रेस भवन उभारणीसाठी प्रयत्न करणे, पक्षातील शिस्त राखण्यासाठी समिती स्थापन करणे, युवकांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे, सामाजिक संस्था व स्वयंसेवी संघटनांशी समन्वय वाढविणे तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी नियोजन करणे, या विषयांवरही चर्चा झाली.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मार्गदर्शन करताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील फुटीमागे संजय देशमुख यांची प्रमुख भूमिका असल्याचा आरोप केला. त्यांनी जनतेची व महाविकास आघाडीची फसवणूक केल्याची टीकाही केली.

माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी यवतमाळ जिल्ह्यात काँग्रेसची विचारधारा आजही मजबूत असल्याचे सांगत पक्ष जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष करेल, असा विश्वास व्यक्त केला. माजी मंत्री वसंतराव पुरके यांनी पक्षनिष्ठेचे महत्त्व अधोरेखित करत पक्षाशी बेईमानी करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी संघटन मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले.

जिल्हाध्यक्ष अॅड. सचिन नाईक यांनी भविष्यात काँग्रेसचा कारभार अधिक पारदर्शक राहील, सर्व घटकांना प्रतिनिधित्व दिले जाईल आणि लोकाभिमुख प्रश्नांवर पक्ष सातत्याने संघर्ष करेल, असे स्पष्ट केले.

बैठकीला खासदार प्रतिभा धानोरकर, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, वसंतराव पुरके, माजी आमदार वामनराव कासावार, माजी आमदार डॉ. वजाहत मिर्झा, प्रदेश उपाध्यक्ष आरीज बेग, संध्या सव्वालाखे यांच्यासह जिल्ह्यातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवविवाहितेचा संशयास्पद मृत्यू : नातेवाईकांनी केले रास्ता रोको आंदोलन

### निष्पक्ष चौकशीची मागणी






प्रतिनिधी २२ जून

**आर्णी** : शहरातील सिसोदिया नगर परिसरात २४ वर्षीय विवाहितेचा संशयास्पद मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. सौ. साक्षी अभय चौधरी (वय २४) हिचा मृतदेह राहत्या घरी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

माहितीनुसार, साक्षी हिचा विवाह काही महिन्यांपूर्वी दाभडी येथील ओंकारेश्वर मंदिरात झाला होता. विवाहानंतर सर्व काही सुरळीत सुरू असताना सासरच्या मंडळींकडून सोन्याची अंगठी व रोख रकमेची मागणी केली जात असल्याचा आरोप तिच्या माहेरच्या नातेवाईकांनी केला आहे.

साक्षीच्या वडिलांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत पती, सासू आणि सासरे यांच्याकडून मानसिक व शारीरिक छळ होत असल्याचा आरोप केला आहे. तसेच मुलीच्या मृत्यूची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

घटनेची माहिती मिळताच आर्णी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. शनिवारी यवतमाळ येथे इन-कॅमेरा शवविच्छेदन प्रक्रिया पार पडली.

शवविच्छेदनानंतर मृतदेह आर्णीकडे आणण्यात येत असताना गुरुनानक ढाबा परिसरात नातेवाईक, ग्रामस्थ आणि समाजबांधवांनी संताप व्यक्त केला. या वेळी काही काळ रस्त्यावर आंदोलन करण्यात आले. मृत साक्षीला न्याय मिळावा व प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी आवश्यक बंदोबस्त तैनात केला आहे. प्रकरणाचा तपास आर्णी पोलिस ठाण्याचे ठाणेदार निलेश सुरडकर हे पोलीस उपविभागीय अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

शवविच्छेदन अहवाल, फॉरेन्सिक तपास आणि पोलिस चौकशीनंतरच मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासाच्या निष्कर्षाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सहलीदरम्यान विद्यार्थ्याचा पाण्यात बुडून मृत्यू; चौकशीची मागणी

प्रतिनिधी २२ जून

**यवतमाळ** : शहरातील एका खासगी शिकवणी वर्गाच्या सहलीदरम्यान दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी उघडकीस आली. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी मृत विद्यार्थ्याच्या आईने पोलिसांकडे केली आहे.

थायलेश चंद्रमणी मेश्राम (वय १५, रा. शरदनगर, यवतमाळ) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो अणे महाविद्यालयात दहावीत शिक्षण घेत होता. तसेच शहरातील पराते एज्युकेशन अकादमीत शिकवणीस जात होता.

पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, २० जून रोजी रात्री शिकवणी संचालकांनी विद्यार्थ्यांना सहलीसाठी जाण्याची माहिती दिली होती. त्यानुसार थायलेश रविवारी सकाळी शिकवणीतील शिक्षक व अन्य विद्यार्थ्यांसमवेत सहलीसाठी गेला होता. सकाळी त्याने आईशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून सहलीसाठी जात असल्याचे सांगितले होते.

दुपारी त्याच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यानंतर दुपारी सुमारे ३.१४ वाजता शिकवणी संचालकांचा फोन येऊन थायलेश पाण्यात बुडाल्याची माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर मुलाचा मृत्यू झाल्याचे आढळून आले, असे आईने पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद केले आहे.

घटना आर्णी बायपास परिसरातील रेल्वे पुलाजवळील नाल्यात घडल्याचे सांगण्यात आले. मृत्यू नेमका कसा झाला, सहलीदरम्यान सुरक्षेची कोणती उपाययोजना करण्यात आली होती का, याबाबत पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे.

दरम्यान, मुलाच्या मृत्यूबाबत सखोल तपास करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. अवधूतवाडी पोलिस ठाण्यात या प्रकरणाची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## रुग्णवाहिकेला आग; वाहन जळून खाक

### ब्राह्मणीजवळील घटना; चालक थोडक्यात बचावला




प्रतिनिधी २२ जून

**यवतमाळ** : कोलार-पिंपरी मार्गावरील ब्राह्मणी गावाजवळ रुग्णवाहिका झाडावर आदळून पेट घेतल्याची घटना घडली. अपघातानंतर काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने रुग्णवाहिका पूर्णपणे जळून खाक झाली. चालकाने प्रसंगावधान राखून वेळीच बाहेर पडल्याने जीवितहानी टळली.

रुग्णवाहिका कोलार-पिंपरी मार्गावरून जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे वाहन रस्त्यालगतच्या झाडावर जाऊन आदळले. धडकेनंतर वाहनातून धूर निघू लागला आणि काही क्षणांतच आग भडकली. अपघाताची जाणीव होताच चालकाने तातडीने वाहनाबाहेर पडून स्वतःचा बचाव केला. अपघाताच्या वेळी रुग्णवाहिकेत रुग्ण अथवा अन्य कर्मचारी नसल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. आग विझविण्याचे प्रयत्न करण्यात आले; मात्र तोपर्यंत रुग्णवाहिका पूर्णपणे जळून गेली होती. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला असून चालकाची वैद्यकीय तपासणी तसेच अपघात आणि आगीमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. वाहनाला आग अपघातामुळे लागली की तांत्रिक बिघाडामुळे, याचाही तपास केला जात आहे.

## जिजामाता महाविद्यालयात जागतिक योग दिन

प्रतिनिधी २२ जून



**दारव्हा** : नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ संचालित जिजामाता कला महाविद्यालय, कृषी महाविद्यालय व शिक्षण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिजामाता कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, खेळ व क्रीडा विभाग, आयक्यूएसी आणि राज्यशास्त्र विभागाच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात योगगुरू दिलीप उमरतकर (जिल्हाध्यक्ष, योग साधना, यवतमाळ) यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी योगाचे विविध प्रकार, त्यांचे आरोग्यदायी फायदे तसेच दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचे महत्त्व याविषयी माहिती दिली. योगाचा नियमित सराव केल्यास शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोळंके, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य पंकज खाडे व शिक्षण महाविद्यालयाचे देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी तथा आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. रामधन हिरे आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयवंत जुकरे यांनी केले.

प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. सोळंके यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. हिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. जुकरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## कारवर दगडफेक; चिमुकली जखमी




प्रतिनिधी २२ जून

**यवतमाळ** : शहरातील विदर्भ हाऊसिंग सोसायटी परिसरात क्षुल्लक कारणावरून एका माथेफिरू व्यक्तीने कारवर दगडफेक केल्याची घटना सोमवारी सायंकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेत कारमधील एका लहान मुलीला दगड लागून किरकोळ दुखापत झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, विदर्भ हाऊसिंग परिसरातील माजी मंत्री संजय राठोड यांच्या कार्यालयासमोरून एक मारुती आर्टिका कार जात असताना अज्ञात व्यक्तीने अचानक दगडफेक केली. त्यावेळी कारमध्ये महिला व लहान मुले प्रवास करीत होती. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे वाहनातील प्रवाशांमध्ये घबराट पसरली.

दगड कारच्या काचेवर आदळल्यानंतर त्याचा फटका एका चिमुकलीला बसल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

दरम्यान, घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये संशयित व्यक्तीचे चित्रण झाल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित माथेफिरूविरुद्ध कठोर कारवाई करून त्याचा तातडीने शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## फुलसावंगी येथे उर्दू हायस्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन

प्रतिनिधी २२ जून



**फुलसावंगी** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जे. एस. पी. एम. उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, फुलसावंगी येथे शनिवारी योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक मोहम्मद मुसद्दीक यांनी योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, आरोग्यदायी फायदे तसेच मानसिक शांतता, एकाग्रता आणि शारीरिक तंदुरुस्ती राखण्यासाठी योगाची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर त्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक सादर केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी सामूहिक योगाभ्यास केला. कार्यक्रमास शिक्षक सय्यद वसीम रिझवी, सय्यद मुजाहिद, शाहिद खान, शबिना बानो, सुमैया अंजुम, फातेमा शेख तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी इरफान देशमुख, शेख जावेद, रफीक गौरी, रफीक नवाब आणि शेख मुजफ्फर उपस्थित होते. सामूहिक योगाभ्यासातून "सुदृढ शरीर, निरोगी मन" हा संदेश देण्यात आला. शांतिपाठ व सर्वांच्या उत्तम आरोग्यासाठी सदिच्छा व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## उमरखेड-ढाणकीत मटका-जुगार सुरू

प्रतिनिधी २२ जून




**उमरखेड** : उमरखेड शहरासह ढाणकी आणि तालुक्यातील काही भागांमध्ये अवैध मटका, जुगार व इतर बेकायदेशीर धंदे सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. या प्रकारांवर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप करत नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे लक्ष वेधले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही ठिकाणी मटका व जुगाराचे अड्डे सुरू असल्याने युवकांमध्ये व्यसनाधीनतेची प्रवृत्ती वाढत असून अनेक कुटुंबांवर आर्थिक परिणाम होत आहेत. कायद्याने बंदी असलेल्या या व्यवसायांविरोधात नियमित कारवाई होणे अपेक्षित असताना त्याबाबत अपेक्षित परिणाम दिसत नसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

### नागरिकांचा सवाल

- अवैध धंदे सुरू नसतील तर वस्तुस्थिती स्पष्ट करावी.
- सुरू असतील तर संबंधितांवर तातडीने कारवाई करावी.
- तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून अहवाल जाहीर करावा.

सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, प्रशासनाने ठोस भूमिका घेतल्यास अशा अवैध प्रकारांवर आळा घालणे शक्य आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी विशेष मोहीम राबवून वस्तुस्थिती तपासावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, काही नागरिकांनी स्थानिक पातळीवर राजकीय दबावामुळे कारवाई होत नसल्याचा संशय व्यक्त केला आहे. मात्र, या आरोपांना कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नसून याबाबत निष्पक्ष चौकशीची मागणी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार अवैध जुगार, मटका व सट्टा व्यवसाय दंडनीय गुन्हा आहे. त्यामुळे उमरखेड व ढाणकी परिसरातील तक्रारींची सखोल चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

अवैध धंद्यांबाबतच्या तक्रारींची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि स्थानिक पोलीस प्रशासन विशेष मोहीम राबविणार का, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## योगातून निरोगी जीवनशैलीचा संदेश

प्रतिनिधी २२ जून




आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासने शिकविताना योगगुरू गजानन चौधरी. दिग्रस येथे आयोजित योग दिन कार्यक्रमात योगाभ्यास करताना भाजप पदाधिकारी व नागरिक.

**दिग्रस** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दिग्रस येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. योग ही केवळ व्यायामपद्धती नसून निरोगी आणि संतुलित जीवनशैलीचा आधार असल्याचे प्रतिपादन योगगुरू गजानन चौधरी यांनी केले.

२१ जून हा उत्तर गोलार्धातील वर्षातील सर्वात मोठा दिवस असून योग परंपरेत त्याला विशेष महत्त्व आहे. हा दिवस आध्यात्मिक प्रगतीसाठी अनुकूल मानला जातो, असे चौधरी यांनी सांगितले. भारताने मांडलेल्या प्रस्तावानंतर संयुक्त राष्ट्रांनी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला असून २०१५ पासून तो जगभर साजरा केला जात आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

भाजप व राष्ट्रीय विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात सकाळी योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करण्यात आले. नियमित योगाभ्यासातून निरोगी जीवन कसे जगता येते, याविषयी चौधरी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला भाजपचे पुसद जिल्हा उपाध्यक्ष डॉ. गजानन निचत, दिग्रस विधानसभा प्रमुख अरुण राठोड, रमेश करवा, शहराध्यक्ष अभय इंगळे, संयोजक अमित चिद्दरवार, सहसंयोजक संजय घरत, संतोष मांजरखेडे, सतीश बनगीनवार, विष्णू राठोड, प्राचार्य मंगला मेश्राम यांच्यासह शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. २२ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# शहरात काही भागात विजेचा लंपडाव

**अमरावती:** कुठलीही आपत्कालीन परिस्थिती नसताना महानगरातील विविध भागात सुरू असलेल्या विजेच्या लपंडावामुळे, वीज ग्राहक वैतागले आहेत. दिवसातून किमान दोन तीन वेळा वीज पुरवठा खंडित होणे, हे जुने शहरातील वीज ग्राहकांच्या अंगवळणी पडले आहे. मात्र आता हा प्रकार महानगरातील इतर भागातही सुरू झाला आहे. महावितरण कंपनीचा कारभार इतका ढेपाळला आहे की, नागरिक, संघटना आणि राजकीय पक्षांच्या निवेदनं देण्याने आणि आंदोलनांने काहीही फरक पडत नाही. कंपनीचे वरिष्ठ अधिकारी कागदोपत्री देखभाल, दुरुस्ती करण्याचे आदेश देतात. मात्र समस्या कायमस्वरूपी निवारण करण्यासाठी प्रयत्न करा असे वीज ग्राहकांचे म्हणणे आहे.



महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत मुंबई येथे होणार आहे. तदपूर्वी रविवार दिनांक २१ जून २०२६ रोजी सरकारच्या वतीने विधिमंडळ परिसरात पूर्वसंध्येला चहापान कार्यक्रम आयोजन करण्यात आले. पावसाळी अधिवेशन २०२६ च्या निमित्ताने आयोजित चहापान कार्यक्रमात सहभागी होताना महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्यासमवेत आमदार - संजय खोडके तसेच राज्य विधिमंडळाचे अन्य सदस्य.

# परिमंडळातील स्मार्ट टीओडी मीटरधारक ग्राहकांना तीन महिन्यांत १.६५ कोटींची सवलत

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती:** स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) मीटरमुळे घरगुती वीज ग्राहकांना दिवसा वीज वापरावर मिळणाऱ्या सवलतीचा लाभ वाढत असून, अमरावती परिमंडळातील ग्राहकांना एप्रिल ते जून २०२६ या तीन महिन्यांत तब्बल १ कोटी ६५ लाख ११ हजार रुपयांची सवलत मिळाली आहे.

राज्यात घरगुती ग्राहकांसाठी स्मार्ट टीओडी मीटर बसविण्याची मोहीम सुरू आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या नव्या वीजदरानुसार, दिवसा वीज वापरणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपया सवलत जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार, १ जुलै २०२५ पासून या सवलतीचा लाभ ग्राहकांना मिळण्यास सुरुवात झाली. जुलै २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत प्रति युनिट ८० पैशांची सवलत देण्यात येत होती. एप्रिल २०२६ पासून ही सवलत वाढवून प्रति युनिट ८५ पैसे करण्यात आली आहे.

स्मार्ट टीओडी मीटरमुळे वीज वापराचे रीडिंग स्वयंचलित आणि अचूक पद्धतीने घेतले जात असल्याने बिलिंगमधील अचूकताही वाढली आहे. तसेच ग्राहकांना मोबाईलद्वारे तासागणिक वीज वापराची माहिती उपलब्ध होत असल्याने वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य होत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वीज वापरावर सवलत मिळत असल्याने वॉशिंग मशीन, गिझर, एअर कंडिशनर आणि इतर अधिक वीज वापरणारी उपकरणे या वेळेत वापरल्यास ग्राहकांना आर्थिक लाभ होत आहे.

अमरावती परिमंडळातील सुमारे ५ लाख ५६ हजार ग्राहकांना एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांत ही सवलत मिळाली आहे. त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ३ लाख २८ हजार ग्राहकांना १ कोटी १२ लाख ५६ हजार रुपयांची, तर यवतमाळ जिल्ह्यातील २ लाख २८ हजार ग्राहकांना ५२ लाख ५४ हजार रुपयांची सवलत मिळाली आहे. दरम्यान, स्मार्ट टीओडी मीटर हे प्री-पेड नसून पोस्टपेड असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. पूर्वीप्रमाणेच वीज वापरानंतरच ग्राहकांना बिल मिळणार असून, मीटर बसविण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. शिवाय टिओडी स्मार्ट मीटर विषयी शंका असल्यास त्या दूर करण्यात येणार असल्याचेही महावितरणने स्पष्ट केले आहे.त्यामुळे घरगुती ग्राहकांनी स्मार्ट मीटरला विरोध करण्याऐवजी सत्यता पडताळून वीज मीटर लावून घेण्यास सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# अमरावती शहर गुन्हे शाखे कडुन सहा तासात खूनाच्या गुन्ह्यातील आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती :** अमरावती शहर गुन्हे शाखे कडुन अवघ्या सहा तासाचे आत खूनाच्या गुन्हातील आरोपी ताब्यात घेण्यात यश आले आहे.

पोलीस स्टेशन बडनेरा हददीमध्ये देशीदारू दुकाना जवळ एक इसमाचा खून झाल्याबाबतची माहीती प्राप्त झाल्याने पोलीस आयुक्तालयाती सर्व वरिष्ठ अधिकारी यानी घटनास्थळावर भेट दिली असता, ओम आशिष कैथवास रा. माता फाईल जुनी वस्ती बडनेरा याला धारदार शस्त्राने मारून ठार केल्याची प्राथमीक माहीती प्राप्त झाली होती.

सदर गुन्हाचे घटनास्थळावर तात्काळ पोलीस निरीक्षक अतुल वर, गुन्हे शाखा यांनी स्टाफ सह



भेट दिली असता गुन्हयाबाबत सविस्तर माहीती घेतली असता मृतक व आरोपी याचा कोणत्यातरी कारणावरून भांडण झाल्याची माहीती मिळाली गुन्हयातील आरोपी बाबत कोणतीही माहीती नसताना तात्काळ आरोपी निष्पन्न करून आरोपी रोशन धनराज कैथवास वय १९ वर्ष रा. भगतसिंग चौक जुनी वस्ती बडनेरा, संकेत विनोद कैथवास वय २० वर्ष रा. माताफैल जुनी वरती बडनेरा अमरावती, एक विधी संघर्ष बालक यांना बोरगांव डॅप येथून त्याचे यामाहा एम.टी गाडी सह ताब्यात घेतले त्याचे कडे गुन्हा संबधाने प्राथमीक तपास केला असता आरोपीतांचे व मृतक यांच्या मध्ये जुन्या वादावरून भांडन होवून आरोपीतांनी मृतक याला धारदार चाकूने मारून खून केल्याचे सांगीतले आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे, सपोआ कैलास पुंडकर गाडगेनगर विभाग यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक अतुल वर, पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात स.पो.नि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, जहीर शेख, सचिन बहाळे, नईम बेग, अतुल संभे, नापोका विकास गुडधे, पोका विशाल वाकपांजर, राजीक रायलीवाले, योगेश पवार, चेतन गुल्हाने चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# सरस्वती नगरातील घरातून चोरी केलेले मंगळसुत्र आरोपीकडून जप्त करण्यात पोलिसांना यश

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती :** पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे दि. ०१/०६/२०२६ रोजी फिर्यादी नामे- मंगेश उत्तमराव आंबेकर, रा. सरस्वती नगर, अमरावती यांनी तक्रार दिली की ते दि. २३/०४/२०२६ रोजी लग्ना कार्याकरीता बाहेरगावी जात असतांना त्यांचे पत्नीचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र वजन अंदाजे ५ ते ६ ग्रॅम वजनाचे किं.अं. ४०,०००/- रु. चे घरात विसरुन गेले होते. नंतर लग्ना कार्यालतुन घरी परत आल्यावर त्यानी मंगळसुत्राची पाहणी केली असता ती मिळुन आली नाही. वरुन सदरचे मंगळसुत्र चोरी गेले बाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पो.स्टे. गाडगेनगर येथे अप.नं. ६२८/६ कलम ३०५(अ)



भा.न्या.सं. अन्वये दाखल करुन तपासात घेण्यात आला आहे.

सदर गुन्हा तपासात विचारपुस दरम्यान फिर्यादीचे घरी येणारे लहान बालकास विचारपुस केली असता सदरचा गुन्हा शंतनु प्रदिप पवार, वय २४ वर्ष, रा. चौधरी लाईन, गाडगेनगर, अमरावती याचे सांगणेवरुन मोबाईलच्या नादाखाली १२ वर्षा आतील अज्ञान बालकाने केला असल्याचे उघड झाले फिर्यादीचे घरातुन चोरी केलेले सोन्याचे मंगळसुत्र वजन अंदाजे ६ ग्रॅमचे जवळपासचे जुन्या दरानुसार ४०,०००/- रु. चे नविन दरानुसार किं.अं. ९०,०००/-रु. चे आरोपीने चोरी करुन त्याची सोन्याची लगड तयार करुन स्वताजवळ ठेवुन घेतल्याचे गुन्हा तपासात निष्पन्न झाल्याने व त्याबाबतची आरोपीने कबुली देवुन सोन्याची लगड किं.अं. ९०,०००/- रु. ची पंचासमक्ष पोलीसांचे ताब्यात दिली वरुन ती गुन्हा तपासकामी जप्त करण्यात येवुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदरची कार्यवाहीपोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे, सहा. पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर, गाडगेनगर विभाग, अमरावती शहर यांचे निर्देश व सुचनांनुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, पो.नि. (क्राईम) श्रीमती विजया पंधरे, पो.नि. (प्रशासन) प्रमोद पाचकवडे, यांचे मार्गदर्शनात डि.बी. पथक प्रमुख पोउपनि योगेश श्रीवास, पोहवा. भारत वानखडे, पोहवा. नंदकिशोर करोची, पो.ना. राजेश गुरेले, पो.शि. सुशांत प्रधान, पो.शि. धनराज कुमरे, पो.शि. महेश शर्मा, चालक पो.शि. बळीराम गायकवाड यांचेद्वारे करण्यात आली आहे.

# जिजाऊ बँक, लखनऊ बँकिंग समिट २०२६ मध्ये बेस्ट अर्बन कॉपरेटिव्ह बँक पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती :** नवी दिल्ली भारत नेटवर्क व राष्ट्रिय स्तरावरील नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन कोऑपरेटिव्ह बँक्स आणि पूणे अर्बन कोऑपरेटीव्ह बँक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने लखनऊ उत्तर प्रदेश येथे जून२०२६मधे संपन्न झालेल्या डिजिटल बँकिंग, कोअर बँकिंग आधुनुकिकरण प्रशिक्षण व पुरस्कार या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र अर्बन बँक फेडरेशन असोसिएशन महाराष्ट्र चे अध्यक्ष अजय ब्रम्हेच्या पुणे डिस्ट्रिक्ट व असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. सुभाष मोहिते आणि आसाम शिखर बँकेचे अध्यक्ष बिश्वजीत फुकण आमदार तथा उत्तर प्रदेश अर्बन बँक असोसिएशनचे अध्यक्ष आर सी वर्मा यांच्या शुभहस्ते एम्पॉवरिंग को-ऑपरेटिव्ह बँक फॉर ए आय ड्रीव्हन फ्युचर या या विषयावरील प्राथमिक सत्राचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभहस्ते रामदा हॉटेल ऑडीटोरीयम लखनऊ येथे दीप प्रज्वलनाने करण्यात आले. आधुनिक काळात बँकिंग स्पर्धेमध्ये डिजिटलायझेशन चे अत्यंत



महत्व असून सहकारी बँकांना आधुनिकीकरणाच्या बँकिंग प्रवासात युवा वर्गाला सुविधा देण्यासाठी डिजिटल बँकिंग मोबाईल बँकिंग यासारख्या सेवा कार्यान्वित करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र अर्बन बँक फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा यांनी विशद केले . डिजिटल बँकिंग फॉर ऑल , एक्सपांडिंग फायनान्शियल इंटेलिजन अँड ऑपर्च्युनिटीज या विषयावरील चर्चासत्रात विविध बँकांचे व्यवस्थापकीय प्रबंधक विठ्ठल धनानी, नरेंद्र सिंग डाबी, शशांक शर्मा स्कोरेम सोल्युशन, पराग सामंत एसआयेल इन्फोटेक, डॉ.संजय घोडके एमडी पुणे पीपल्स यांनी बँक ग्राहकांच्या संरक्षणार्थ कर्ज वाटपाच्या आधुनिक धोरणामध्ये एआयड्रीव्हन मॉडेलचा अंतर्भाव करण्याची गरज असल्याचे नमूद केले. डिजिटल पेमेंट चे संगणकीकरण धोरण तसेच अद्यावत संगणक सेवा नागरी बँकांनी प्राप्त करण्याची भुमिका प्रतिपादन केली. बँकिंग टेक्नॉलॉजी सोल्युशनस फोर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक याची विस्तृत माहिती सील इन्फो सोल्युशनचे पराग सामंत एमडी यांनी दिली.

अॅड .जयंत शालिग्राम व अॅड सुभाष मोहिते यांनी अर्बन बँकेमधील सेवेतील कर्मचाऱ्यांना नवीन लेबर कोड अंतर्गत कीमान वेतन, कामाच्या अटी व कंत्राट कालावधी निर्धारित केले असल्याचे सांगितले. मॉडर्न सायबर अंड रिस्क स्ट्रटेजिज अंतर्गत डीपीडीपीक्ट, या चर्चासत्रात ग्राहक अवेअरनेस, फ्रॉड रिस्क ईन डिजिटल पेमेंट यावर तज्ञांनी मार्गदर्शन केले. या परिषदेत भारत रत्न सहकारीता सन्मान २०२६ समारंभात जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँक अमरावतीला बेस्ट अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक हा सन्मान बँकेचे संस्थापक अध्यक्ष ईजी.अविनाश कोठाळे,व बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे संगणक तज्ञ संचालक डॉ. सुरेंद्र दाळु यांना बँकेकरीता प्रदान करण्यात आला. आर्थिक दृष्ट्या मागास क्षेत्रात अमरावती मुख्यालयी जिजाऊ बँक२०००मधे २५वर्षापुर्वी सुरू झाली असून बँकेच्या ११शाखांमधून २०२५ - २६ या आर्थिक वर्षात बँकेने ४९७ कोटी ठेवी, ३२६ कोटी कर्ज, भागभांडवल पर्याप्तता १५.८२ टक्के, २३२ कोटी गुंतवणूक ,नेट एनपीए १.८३ टक्के आहे.

# महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र तोडुन जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला ताब्यात घेतले

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती:** १७.०६.२०२६ रोजी ०१.०० वा दरम्यान फिर्यादी माया गणेश डागा वय ५० वर्ष रा. बालाजी प्लॉट अमरावती ही पायी जात असतांना एक अज्ञात इसम हा काळया रंगाचे मोपेड गाडी ने येवुन फि चे गळयातील मंगळसुत्र जबरीने हिसकावुन पळुन गेला त्या बाबत पो. स्टे राजापेठ ला अप क ५०७/२६ कलम ३०९(४) भा. न्या. सं प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयांचा समांतर तपास गुन्हे शाखा पथका कडून करीत असतांना गुप्त बातमीदार नेमुण तसेच घटनास्थळावरील सि.सि.टि.व्हि फुटेजची पाहणी करून त्यानंतर आरोपी ज्या मार्गाने गुनहा करून परत गेला त्या परीसरातील जवळपास १०० च्या वर ठिकाणावरील सि.सि.टि.व्हि फुटेजची पाहणी करून मागील चार दिवसा पासुन सदर आरोपीचा पाठलाग करून सि.सि.टि.व्हि. फुटेजच्या आधारे आरोपीच्या घरा पर्यंत पोहचण्यात आले व त्या नंतर गुन्हयातील आरोपी नामे अनिल शेषराव लाखपुरकर वय ५३ वर्ष रा. शिवपार्वती रेसिडन्सी वासनकर वाडी अमरावती यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची कबूली दिली.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव अनिल शेषराव लाखपुरकर वय ५३ वर्ष रा. शिवपार्वती रेसिडन्सी वासनकर वाडी अमरावती जप्त मुद्देमला ८ ग्रॅम सोन्याची लगड कि.अं. १,१२,०००/-,गुन्हयात ापरलेली मोपेड गाडी क. एम.एच २७ बि.एन. ७५६१ कि.अं.४०,०००/- असा एकुण १,५२,०००/- चा मुद्देमाल सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परीमंडळ-१ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परीमंडळ-२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय तथा गुन्हे) रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे) शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक अतुल वर, पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, गजानन ढेवले, दिपक सुंदरकर, मनोज ठोसर, मंगेश परीमल, आस्तिक देशमुख, नईम बेग, अतुल संभे, जहीर शेख, सचिन बहाळे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, चेतन गुल्हाने, राजीक रायलीवाले, चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# जिल्ह्यात खाद्यतेल अभियानांतर्गत 'मिनी ऑईल मिल' साठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती:** जिल्ह्यामध्ये सन २०२६-२७ या वर्षात सोयाबीन पिकासाठी 'राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया योजना' राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत जिल्ह्यात 'मिनी ऑईल मिल (एक्सपेलर)' या घटकाचे लक्षांक प्राप्त झाले आहेत. पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा जास्तीत-जास्त प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेससह आणि मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेसशिवाय अशा दोन घटकांचा लाभ वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि मूल्य साखळी भागीदार गट यांना दिला जाणार आहे. कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या नियमांनुसारच लाभार्थ्यांची निवड केली जाईल आणि यासाठी महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांनी सादर केलेल्या अर्जांमधून प्राधान्याने या योजनेसाठी लाभार्थी निवडले जाणार आहेत. या अभियानांतर्गत आर्थिक मर्यादेचा तपशील पाहता, मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेससह या घटकासाठी ४ लाख रुपये प्रति युनिट खर्च मर्यादा असून, युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत, अथवा युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत अनुदान देय राहील; तर मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेसशिवाय या घटकासाठी ३ लाख रुपये प्रति युनिट खर्च मर्यादा असून, यामध्येही युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत, अथवा युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत अनुदान उपलब्ध करून दिले जाईल.

पात्रतेच्या निकषानुसार जिल्ह्यातील इच्छुक वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि मूल्य साखळी भागीदार गटांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत आणि या योजनेच्या अधिक माहितीसाठी व तांत्रिक तपशिलासाठी नागरिकांनी आपापल्या संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# अमरावतीत १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा प्रेरणादायी सोहळा

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती:** निसर्गाच्या सानिध्यात आणि उत्साहाच्या वातावरणात, अमरावती येथील जिल्हा स्टेडियममध्ये १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या दिमाखात साजरा झाला. विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात केवळ योगसाधनाच झाली नाही, तर निरोगी समाजाचे एक सुदृढ स्वप्नही साकारताना दिसले.

### योगपर्वाचा सुवर्णक्षण

क्रीडा विभागाचे श्री जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत प्रभावी होते. या योगमयी वातावरणात दोन प्रमुख मार्गदर्शकांची उपस्थिती उपस्थितांसाठी पर्वणीच ठरली. 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे प्रणेते श्री श्री रविशंकरजी यांचे शिष्य श्री अग्रवाल साहेब आणि योगगुरू रामदेव बाबांचे शिष्य श्री योगेश राठीजी यांनी योगविद्येचे धडे दिले.

श्री अग्रवाल साहेब यांच्या प्रेमळ आणि सुमधुर वाणीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या मार्गदर्शनात जेव्हा उपस्थितांनी




योगसाधना केली, तेव्हा उपस्थित जनसमुदायाला त्यांच्यात एका कुशल गुरूचा भास झाला. जवळपास दीड तास चाललेल्या या सत्रात विद्यार्थी, शासकीय कर्मचारी, विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि ज्येष्ठ नागरिकांचा 'वेल कम ग्रुप' मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. जिल्हा स्टेडियमचा हॉल मानवी गर्दीने आणि सकारात्मक ऊर्जेने फुलून गेला होता.

### साधेपणातील मोठेपण: लप्पी भैया जाजोदिया

ङकार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते आदरणीय श्री लप्पी भैया जाजोदिया यांची उपस्थिती. व्यासपीठाचे वैभव ङसांभाळण्याऐवजी त्यांनी सर्वसामान्य उपस्थितांमध्ये बसून पूर्ण वेळ योगाभ्यास केला. त्यांचे हे साधेपण समाजसेवेचा आदर्श मांडणारे होते.

समापनाप्रसंगी बोलताना त्यांनी आरोग्याचे महत्त्व विषद करताना सांगितले, ठमानवाकडे कितीहीङ ङअमाप संपत्ती असली, तरी त्याचे खरे मूल्य तेव्हाच असते जेव्हा तुमचे आरोग्य उत्तम असते. आरोग्य असेल तरच तुम्ही आयुष्याचा आनंद घेऊ शकता.ठ भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाच्या माध्यमातून देशाला एक 'बिना पैशाचा दवाखाना' दिला आहे, अशा शब्दांत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ठसकाळी सूर्याला साक्षी ठेवून नियमित योग केल्यास औषधांची गरजच उरणार नाही,ठ हा त्यांचा मंत्र उपस्थित प्रत्येकाच्या काळजाला भिडला.ङ

### सांगता: आरोग्यदायी भवितव्याकडे

योगाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्याबद्दल त्यांनीङ ङपंतप्रधान मोदींच्या प्रयत्नांचे कौतुक केले. योगामधील हीच ती अलौकिक शक्ती आहे, जी माणसाच्या अंतर्गत आजारांना दूर सारून त्याला नव्या चैतन्याने भरते. कार्यक्रमाची सांगता श्री योगेश राठीजी यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.ङ

हा १२ वा योग दिन केवळ एक सरकारी कार्यक्रम नव्हता, तर ती अमरावतीकरांच्या आरोग्याची एक सामूहिक शपथ होती. या उपक्रमातून सर्वांना एकच संदेश मिळाला—योगा केवळ व्यायाम नाही, ती एक जीवनपद्धती आहे, जी खऱ्या अर्थाने समाजाला सुदृढ आणि समृद्ध करते.

ङअमरावतीमधील हा १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन खऱ्या अर्थाने एक यशस्वी आणि प्रेरणादायी सोहळा ठरला. अशा उपक्रमांमुळेच आजचा समाज शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम होत आहे.






# समाजकल्याण अधिकारी पैशासाठी लाचार, मिनी ट्रॅक्टर खरेदीत भ्रष्टाचार!

## समाजकल्याण नव्हे 'कथित' अधिकाऱ्याचे स्वकल्याण, फक्त वसुलीवरच ध्यान

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील ५० महिला बचत गटाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने मिनी ट्रॅक्टर देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला.परंतु येथील 'कथित' अधिकाऱ्याने त्याच्या दलालीच्या रक्कमेच्या हव्यासापोटी संगनमतात सहभागी असलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या विक्रेत्याने मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून लालची अधिकाऱ्याला लाखो रूपयाचा मलिदा वाटल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे. समाज कल्याण अधिकारी पैशासाठी लाचार असुन मिनी ट्रॅक्टर खरेदीत भ्रष्टाचार झाल्याची चर्चा आहे.

समाज कल्याण विभागामार्फत महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी शासनाकडून विविध योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अनुदान मिळते. त्या योजना प्रभावीपणे राबवून बचत गटातील सर्व महिलांना फायदा व्हावा आणि त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी समाज कल्याण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याची आवश्यक्ता आहे.परंतु वाशीम येथील कार्यरत लालची अधिकाऱ्याने स्व-कल्याणासाठी वाशीम व परिसरातील विविध कंपनीच्या ट्रॅक्टर विक्रेत्यांना डावलून चक्क २५० किलोमीटर दूर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमधील 'मॅसे फर्ग्यूसन' कंपनीच्या विक्रेत्यासोबत संगनमत करून मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून स्वत:चे उखळ पांढरे करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या ट्रॅक्टर विक्रेत्याने एका मिनी ट्रॅक्टरची किंमत ३ लाख ८० हजार लावून लालची अधिकाऱ्याला एका ट्रॅक्टरमागे २५ ते ३० हजार रूपयाप्रमाणे लाखो रूपयाचे 'गिफ्ट' म्हणून दिल्याची समाजकल्याण विभागात चर्चा आहे.वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील पात्र असलेल्या महिला बचत गटाने त्यांच्या हिस्याची १० टक्के रक्कम विक्रेत्याच्या खात्यात जमा केल्याचे समजते.तसेच समाज कल्याण विभागाने सर्व महिला बचत गटाच्या खात्यामध्ये ९० टक्के रक्कमेतील ५० टक्के रक्कम जमा केल्याचे वृत्त आहे. आणि उर्वरित ५० टक्के रक्कम मिनी ट्रॅक्टर बचत गटाला मिळाल्यानंतर त्यांच्या बचत खात्यात जमा होणार असल्याचे समजते. मिनी ट्रॅक्टर घेणाऱ्या महिला बचत गटाला छत्रपती संभाजीनगरला सेवा व दुरूस्तीसाठी ये-जा करणे सोयीचे नर्सेल्याने अमरावती विभागीच्या समाज कल्याण आयुक्तांनी 'हा' मिनी ट्रॅक्टर खरेदीचा लालची अधिकाऱ्याने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी केलेला व्यवहार त्वरीत रद्द करून वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी.प्रवर्गातील ५० महिला बचत गटांना न्याय द्यावा,दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी .अशी विविध स्तरातून मागणी होत आहे.



## थोडक्यात

### हरिभाऊ ठाकरे यांचे निधन

•सिटी न्युज ब्युरो @ मंगरुळपीर•



मंगरूळपीर जवळच असलेले चित्रऋषी महाराज वृद्धाश्रम वरुड बु तुळजापूर येथील वृद्धाश्रमा तील वृद्धाश्रित स्वर्गीय हरिभाऊ नारायण ठाकरे यांचे दि

२१जुन रोजी वृद्धपकळाने निधन झाले. त्यांचे वय ७५ होते व ते अतिशय मनमिळावू व शांत, स्वभावाचे व समजदार व्यक्तिमत्व होते. त्यांचा बराच कार्यकाळ चित्र ऋषी आश्रमातच गेला. स्वर्गीय हरिभाऊ नारायणराव ठाकरे यांचा अंत्यविधी वृद्धाश्रम व्यवस्थापनाच्या वतीने पूर्ण रीती रिवाजनुसारच पार पडला..अंत्यविधी करता वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिक, नातेवाईक, संस्थेचे अध्यक्ष भीमराव पी राठोड, प्राचार्य अभिजीत राठोड सोबत सर्व वृद्धाश्रम व्यवस्थापन मंडळाचे सदस्य व विद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते .

### सपकाळ महाविद्यालयात योग दिन

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व.मधुकरराव ल.सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय पिंप्री अवगण येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले फायदे आणि दैनंदिन जीवनातील उपयुक्तता याविषयी प्राचार्य सुनिल सपकाळ यांनी मार्गदर्शन केले.

परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व.मधुकरराव ल. सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होऊन योगाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन विकसित झाला. विद्यालय व महाविद्यालय परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला.

# रिसोडमध्ये अवैध गुटखा, द्या कारवाईचा चटका!

## गोडाऊन मध्ये साठा, साहेब कारवाईसाठी थेट स्थळ गाठा

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाचे आयुक्त म्हणून मुंडे साहेबांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरातील गुटखा माफिया आणि भेसळ करणाऱ्यांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाल्याची चर्चा आहे. त्यांच्या पथकाच्या धडक कारवायांमुळे अनेक ठिकाणी अवैध गुटखा व्यवसायाला मोठा फटका बसला.

याच पार्श्वभूमीवर नागरिकांच्या मनात एक प्रश्न उपस्थित होत आहे—जर एका आयुक्तांच्या पथकामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील गुटखा माफियांमध्ये भीती निर्माण होऊ शकते, तर स्थानिक पातळीवर सातत्यपूर्ण आणि प्रभावी कारवाई का दिसून येत नाही?

मुंडे साहेबांचे पथक वाशिम जिल्ह्यात येणार असल्याची माहिती मिळताच अनेक पानटपऱ्या बंद झाल्या आणि अनेक विक्रेते भूमिगत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले होते. मात्र काही दिवसांनंतर पुन्हा खुलेआम गुटखा विक्री सुरू झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. रिसोड शहर हे गुटखा तस्करीचे मोठे केंद्र बनल्याची भावना अनेकांकडून व्यक्त केली जात आहे. यापूर्वी पोलीस उपविभागीय अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली सुनार गल्ली परिसरातून सुमारे एक कोटी रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला होता. तसेच लोणी फाटा परिसरातून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. त्या कारवायांमुळे गुटखा माफियांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली होती.

मात्र आता पुन्हा शहरात गोडाऊनमध्ये गुटख्याचा साठा करून शहरासह तालुक्यात काळाबाजार सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. त्यामुळे 'पुन्हा एकदा धडक कारवाई करून अवैध गुटखा व्यवसायावर अंकुश आणतील का नवदीप अग्रवाल?' असा सवाल



सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. स्थानिक स्तरावर सकाळी लवकर मोटारसायकलद्वारे ग्रामीण भागात गुटखा पोहोचवला जात असल्याच्याही चर्चा सुरू आहेत. सकाळी सहा वाजल्यापासून विविध गावांकडे मोटारसायकली रवाना होत असल्याचा दावा काही नागरिकांकडून केला जात आहे.

सुरुवातीच्या धडक कारवायांमुळे निर्माण झालेला दरारा कायम राहिला नाही, अशीही चर्चा शहरात ऐकायला मिळते. 'होळीची बोंब चार दिवसांची' या म्हणीप्रमाणे सुरुवातीचा धाक आता कमी झाल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करत आहेत.

'पोलीस उपविभागीय अधिकारी नवदीप अग्रवाल यांनी सुरुवातीला गुटखा माफियांमध्ये निर्माण केलेली दहशत पुन्हा एकदा दिसून यावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. सातत्यपूर्ण आणि प्रभावी कारवाई झाल्यास अवैध गुटखा व्यवसायावर मोठा आळा बसू शकतो,' अशी चर्चा सध्या रिसोड शहरात सुरू आहे. गुटख्याच्या वाढत्या विक्रीमुळे तरुण आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याची चिंता पालक व सामाजिक संघटनांकडून व्यक्त केली जात आहे. शासनाने कठोर कायदेशीर कारवाईची तरतूद केली असली, तरी स्थानिक पातळीवर नियमित धडक मोहिमा राबविणे आवश्यक असल्याचे मत नागरिक मांडत आहेत.रिसोडमध्ये पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात संयुक्त कारवाई करून अवैध गुटखा व्यवसायावर प्रभावी अंकुश आणावा आणि युवकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वंचितच्या जिल्हानिवडणुक अधिकारीपदी अनंतकुमार जुमडे

•सिटी न्युज ब्युरो @ वाशिम•

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष माननिय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशा नुसार पक्षा अन्तर्गत जिल्हा व तालुका पदाधिकारी यांच्या निवडणुका ह्या पुढे कायदेशिर दृष्टीने पार पाडण्या करिता प्रत्येक जिल्ह्याला एक जिल्हा निवडणुक अधिकारीङ म्हणून नियुक्त करण्या साठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला जिल्ह्याचे निरिक्षक माजी आ. नातीकोद्दीन खतीब, भास्करराव भोजने, महासचिव प्रा रंगनाथ धांडे सर, वंचित बहुजन महिला आघाडी अध्यक्षा ज्योतीताई इंगळे, प्रतिभाताई अंभोरे,युवा आघाडी अध्यक्ष, सुर्यकांत गायकवाड हे उपस्थितीत होते.

तालुका अध्यक्ष दिलीप भगत , नरेंद्र राऊत , भारत भगत, विनोद राठोड , युवा



आघाडी उपाध्यक्ष स्वपनिल खडसे . माजी जि प सदस्य देशमुख , माजी प स सभापती वसंतराव राठोड , सुभाष देवडे , शंकरराव तायडे, गुणवंत गहुले , सुरेश सोनोने ,राजु जमदाडे, नारायण मिटकरी, विनोद भगत, गिरीधर शेजुळ , सुनील वानखडे, साहेबराव कांबळे, सुधीर गहुले, कैलाश सावध , भगवान भगत, कृष्णा देशमुख, कैलास राऊत, सुनिताताई खाडे, छायाबाई वानखडे कार्यक्रमाचे संचालन समाधानजी भगत यांनी केले व आभार शकरराव तायडे यांनी मानले व आजच्या बैठकीच्या अध्यक्ष यांच्या संमतीने बैठकीचा समारोप करण्यात आला.

# रिसोड न्यायालयात योग दिन

•सिटी न्युज ब्युरो @ रिसोड•

दिवाणी व फौजदारी न्यायालय रिसोड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या योग दिना ला उपस्थित दिवाणी न्यायाधीश मा.श्री. पी.व्ही.सपकाळ , सह दिवाणी न्यायाधीश डी.एम.गायकवाड, आणि योग प्रशिक्षक अँड. निळकंठराव देशमुख (करडेकर) यांची प्रमुख उपस्थितीत रिसोड न्यायालयाच्या परिसरात आंतरराष्ट्रीय योग संपन्न झाला. या कार्यक्रमाला दिवाणी न्यायालय रिसोडचे सहाय्यक अधीक्षक जी. जा. हजारे, संदीप पंडित, प्रणव तालोट,पंढरी चाटे, संतोष धनगर, शेख जब्बार इत्यादी उपस्थित होते. न्यायाधीश मा.श्री. पी.व्ही सपकाळ साहेब आणि न्यायाधीश डी. एम. गायकवाड यांनी योगा विषयी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड. निळकंठरावजी देशमुख साहेब यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संतोष धनगर यांनी केले.



# सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयात योग दिन




•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयात योग दिन साजरा. स्थानिक सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला.

उद्घाटन प्रा.हरिभाऊ क्षीरसागर सर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय चे प्राचार्य डॉ विजय पांडे, एस एस एम इंग्लिश स्कूल च्या प्राचार्य मीना उबगडे, एम सी व्ही सी चे उपप्राचार्य वींनायक उज्जैनकर, संचालक, शारीरिक शींक्षण प्रा डॉ शुभांगी दामले या प्रसंगी उपस्थित होते.प्रा. हरिभाऊ क्षीरसागर सर यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना प्रत्येकाणे दररोज योग केला पाहिजे, योग आपल्या जीवनातील रोग दुर करून आपले जीवन सुखद आणि निरोगी राहण्यासाठी मदत करते. प्रा. डॉ शुभांगी दामले यांनी याेगा चे फायदे काय आहेत ते सांगितलेया प्रसंगी लाखाला परिसरातील बऱ्याच महिला आणि पुरुष मंडळी त्यासोबत एसएमसी इंग्लिश स्कूलचा का केलेस्टाफ सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाचा स्टाफ आणि एमसीवीसी चा संपूर्ण स्टाफ उपस्थित होता. प्रार्थनेची सुरुवात आणि सांगता प्रार्थना घेऊन झाली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक गजानन वाघ यांनी केले.

# पिंपरी सरहद्द येथे युवकाची निर्घृण हत्या

## चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

•सिटी न्युज ब्युरो @ रिसोड•

रिसोड तालुक्यातील पिंप्री सरहद्द येथील बळीराजा पेट्रोल पंपाजवळ २४ वर्षीय युवकाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिरपूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ३५१(२), ३५१(३), ३(५) (जुनी कलमे ३०२, ५०६, ३४ भा.दं.वि.) अन्वये चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतक अभिषेक विष्णू वाघ (वय २४, रा. उकीरखेडा, ता. रिसोड) याला १८ जून २०२६ रोजी सायंकाळी जेवणासाठी बाहेर जाण्याचे सांगून पिंपरी सरहद्द येथील बळीराजा पेट्रोल पंपाजवळ नेण्यात आले. तेथे जुन्या वादाच्या कारणावरून कोणत्यातरी जड हत्याराने डोक्याच्या मागील बाजूस वार करून त्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी मृतकाचे वडील विष्णू गोविंदा वाघ (वय ४९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंद विनोद मवाळ, प्रतिक संतोष हुंबाड, पवन गजानन दांदडे (सर्व रा. महागाव, ता. रिसोड) तसेच शुभम शेषराव अवचार (रा. अंजनी बु., ता. मेहकर, जि. बुलढाणा)



यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सुमारे तीन वर्षांपूर्वी पैशाच्या कारणावरून वाद झाला होता. तसेच महिनाभरापूर्वी कामावर येण्याच्या कारणावरून धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्याच रागातून ही घटना घडल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. दरम्यान, ही घटना शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील मेहकर–मालेगाव राष्ट्रीय महामार्गावरील ग्राम पिंप्री सरहद्द येथील बळीराजा पेट्रोल पंपाजवळ १८ जून रोजी सायंकाळी घडली. मृतकाच्या वडिलांनी दिलेल्या जबानी रिपोर्टमध्ये संबंधित संशयितांची नावे नमूद असल्याने शिरपूर पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावून घेतले आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार, चौकशी दरम्यान संबंधितांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत असून सध्या त्यांना पीसीआर (पोलीस कोठडी रिमांड) प्रक्रियेखाली ठेवण्यात आले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून पोलीस विविध अंगांनी चौकशी करत आहेत. मृतकावर प्रथम सिग्मा हॉस्पिटल आणि त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचार करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झालावाशिम पोलीस विभागाच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इमरान पठाण करीत आहेत

# नियमित योगाभ्यासातून निरोगी व संतुलित जीवनशैली घडते- जिल्हाधिकारी

•सिटी न्युज ब्युरो @ वाशिम•

नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक जीवनदृष्टी विकसित होते. निरोगी व संतुलित जीवनासाठी प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, व जिल्हा क्रीडा परिषद वाशिम यांच्या संयुक्त वतीने आयोजित जिल्हा क्रीडा संकुल येथे १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास तहसीलदार



पळसकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, महाराष्ट्र सायकलिंग संघटनेचे अध्यक्ष धनंजय वानखेडे, प्राचार्य संजय शिंदे, स्काऊट अँड गाईडचे पवार सर, महाराष्ट्र अॅथलेटिक्स संघटनेचे उपाध्यक्ष प्रा. अनिल बोंडे, तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे, होमगार्ड इन्चार्ज इंगोले , योग मार्गदर्शक कुलदीप बदर, क्रीडा मार्गदर्शक अक्षय टेंभुर्णीकर, बोदडे , मोरे , तिडके , वैद्य, कलीम, राष्ट्रीय खेळाडू अब्दुल यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रा. अनिल बोंडे, प्राचार्य संजय शिंदे, धनंजय वानखेडे आणि तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे यांनी मंचावर योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून उपस्थितांना प्रेरित केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

सोमवार, दि. २२ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## समाजकार्य महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा

**मलकापुरः** स्थानिक दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालयात आज २१ जुन २६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यामध्ये प्राचार्य डॉ देविदास दरेगावे यांनी सर्वप्रथम प्राणायाम व योगासने याचे महत्व उपस्थितांना पटवून दिले त्यानंतर सुरुवातीस सुक्ष्मव्यायामाने योगाची सुरुवात करून कपालभाती, प्राणायाम अनुलोम विलोम, भ्रामरी प्राणायाम, ताडासन, सूर्यनमस्कार अशी विविध योगासने करून मोठ्या उत्सवात योगदीन साजरा करण्यात आला यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. शेवटी सामुहीक प्रार्थनेने योगदिनाची सांगता करण्यात आली.

# खामगावात योग दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी २२ जून

**खामगाव :** येथील पंचशिल होमिओपॅथिक मेडीकल कॉलेजच्या प्रांगणात २१ जून रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात मंचावर डॉ. अशोक बावस्कर, डॉ. अजिंक्य कविश्वर, कल्याणजी गलांडे, डॉ. राजेश राजोरे, डॉ. मंगला कविश्वर उपस्थित होते. योग विद्या धाम नाशिक शाखा-खामगाव व पंचशील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पंचशील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या प्रांगणात सकाळी ६ वाजता आयोजित या कार्यक्रमाला योगप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योग विद्याधाम शाखाअध्यक्ष डॉ. अशोक बावस्कर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अजिंक्य कवीश्वर, डॉ. राजेश राजोरे, डॉ. मंगलाताई कवीश्वर तसेच योग पंडित कल्याणजी गलांडे उपस्थित होते. ओंकार प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून








कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर योग विद्या धामच्या योगशिक्षिकांनी योगगीत सादर केले. प्रास्ताविकमध्ये डॉ. राजेश राजोरे यांनी यामध्ये योगाचे महत्त्व विशद करत कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. अध्यक्षीय मनोगतात डॉ. अशोक बावस्कर यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने योगाभ्यास केल्यास शरीर व मनावर होणारे सकारात्मक परिणाम उपस्थितांना समजावून सांगितले.

यावेळी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या योगशिक्षक व योगसाधकांचा विशेष सत्कार करण्यात आला. आचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल योगशिक्षक डॉ. राजेश राजोरे व योगसाधक डॉ. श्वेता शहा यांचा गौरव करण्यात आला. तसेच आंतरराष्ट्रीय हॅकाथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल रुचिता धंदर हिचे सन्मानचिन्ह योगशिक्षीका संगिता खरसणे यांनी स्वीकारले. यानंतर योग पंडित कल्याणजी गलांडे यांनी आंतरराष्ट्रीय योग प्रोटोकॉलनुसार विविध योगासने व प्राणायामाचे मार्गदर्शन केले. मंचावर नितीन देशमुख, कीर्ती देशमुख, ज्ञानेश्वरी वाघ आणि संगीता खरसणे यांनी योगासनांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांना योगाभ्यास करते वेळी विविध आसने करुन दाखविलीत.

कार्यक्रमात जानवी देशमुख, निकिता चिकणे, खांडे मॅडम, नीताताई बोबडे-पवार, वैशाली पवार, सुनिता पवार यांच्यासह अनेक योगसाधकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे संचालन मंडळ अधिकारी योगाशिक्षक नितीन देशमुख यांनी केले, तर डॉ. अपर्णा बावस्कर यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नारायणराव पिठोरे, सुभाष टाले, संजय कस्तुरे, सुनील जोशी, प्रकाश अग्रवाल, जगदीश मोदी, डॉ. शेलगेनवार, नारायणराव धानोरकर, गजानन वायचाळ, नारायणराव देशमुख, सारंगधर हिंगणे, सखाराम काटोले, राजेंद्र मयूर, दिलीप खेडकर, गोपाल पवार, रितेश काळे, वनिता इंगळे, श्रुती आटोळे, अजित सिंग जाट आदी योगसाधकांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी प्रतिष्ठीत नागरिक अशोकजी केला, शैलेष जयस्वाल, उमाकांत कांडेकर, चोपडाजी व इतर बहुसंख्य योगसाधकांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचा समारोप विश्व कल्याण प्रार्थनेने करण्यात आला.

# शेतकऱ्यांची कटकट मिटली, आता सहायकच करणार ई-पीक पाहणी!

### तांत्रिक अडचणींमुळे शासनाचा निर्णयः १५ जुलैपासून नवी पद्धत, बचत गटांच्या महिलांचाही सहभाग

प्रतिनिधी २२ जून

**खामगाव :** सातबारा उताऱ्यावर पिकांची नोंद करण्यासाठी शेतकऱ्यांना यापुढे स्वतः ई-पीक पाहणी करावी लागणार नाही. गेल्या काही वर्षांत ई-पीक पाहणी प्रक्रियेला मिळालेला अल्प प्रतिसाद आणि शेतकऱ्यांसमोरील तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन राज्य सरकारने यंदापासून पीक नोंदणीची जबाबदारी नियुक्त सहायकांकडे सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यभर ही मोहीम १५ जुलैपासून सुरू होणार आहे.

आतापर्यंत शेतकऱ्यांना मोबाइल ॲपच्या माध्यमातून स्वतःच्या शेतातील पिकांची नोंद करावी लागत होती. मात्र, अनेक ठिकाणी ही प्रक्रिया प्रभावीपणे राबवली जात नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन माहिती संकलित करण्यासाठी सहायकांची नियुक्ती केली जाणार आहे. यामुळे सातबारा उताऱ्यावरील पीक नोंदी अधिक अचूक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या माहितीचा उपयोग विविध कृषी योजनांच्या अंमल बजावणीसाठी होणार आहे.

सातबारा उताऱ्यावर प्रत्यक्ष घेतलेल्या पिकांची डिजिटल नोंद करण्याची शासनाची प्रक्रिया म्हणजे ई-पीक पाहणी. यामध्ये पीक, क्षेत्रफळ आणि लागवडीची माहिती ऑनलाइन नोंदवली जाते.

**नोंदणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना संदेश**

ई-पीक पाहणीची माहिती ॲग्रीस्टॅक प्रणालीशी संलग्न करण्यात येणार असून, नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना मोबाइलवर संदेश पाठवण्यात येणार आहे.

**कशासाठी महत्त्वाची?**

पीक विमा, नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई, कृषी अनुदाने, कर्ज वाटप आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी ई-पीक पाहणीतील माहिती आधारभूत मानली जाते.

अग्रीस्टॅकशी जोडणी

पीक पाहणीची माहिती थेट ॲग्रीस्टॅक प्रणालीशी संलग्न राहणार असून, नोंदणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे माहिती मिळणार आहे.

## वाघजाळ येथे गुटखा पकडला; साडेचार लाखाचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २२ जून

**मोताळाः** बुलढाणा अन्न व औषध प्रशासन विभागाने अक्शन मोडवर येत शासनाने प्रतिबंधीत केलेला सुगंधीत गुटखा व मारुती सुझुकी वाहन, असा ४ लाख ४५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी तिघांवर बोराखेडी पोलिसात विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. सदर कारवाई आज रविवार २१ जून रोजी सकाळी ५ वाजेच्या सुमारास वाघजाळ फाटा येथे करण्यात आली.

राज्यात शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटख्याची अवैध वाहतूक करतांना अन्न व औषध प्रशासन विभागाने पान मसाला व सुगंधीत तंबाखुची वाहतूक करतांना योगेश गणेश गाडेकर व आकाश गाडेकर दोन्ही रा. वाघजाळ ता. मोताळा यांच्याकडून सुगंधीत गुटखा व मारुती सुझुकी वाहन क्र. एम. एच. १९ ओ.पी. २७१५ कारसह ४ लाख ४२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई वाघजाळ येथे राजेंद्र शिंबरे यांच्या घराजवळील रिकाम्या जागी करण्यात आली. या प्रकरणी अक्षय संजय भोपळे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभाग बुलढाणा यांच्या फिर्यादीवरुन बोराखेडी पोलिसांनी योगेश गाडेकर व वाहनाचा मालक आकाश गाडेकर तसेच त्यांना गुटख्याचा पुरवठा करणाऱ्या खामगाव येथील निलेश राठी या तिघांवर बोराखेडी पोस्टे. ला अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या या कारवाईने गुटखा माफीयामध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## लाखनवाडा येथील सराफा दुकानामध्ये चोरी!

### ♦ मुख्य गेट तोडून लाखो रुपयांचे दागिने लंपास

प्रतिनिधी २२ जून

**खामगाव :** लाखनवाडा गावातील मुख्य रस्त्यावरील 'विश्वकर्मा ज्वेलर्स' या सराफा दुकानात अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री चोरी करून लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला. चोरट्यांनी दुकानाचे मुख्य गेट तोडून आत प्रवेश करत सोने चांदीचे दागिने व इतर मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला. ही घटना रविवार, २१ जून रोजी सकाळी दुकान उघडल्यानंतर उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरीस गेलेल्या ऐवजाची नेमकी किंमत पंचनामा व तपासानंतर स्पष्ट होणार असली, तरी प्राथमिक अंदाजानुसार लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वीही लाखनवाडा परिसरात शेतांमधील मोटार पंप, विद्युत साहित्य व इतर वस्तू चोरीच्या घटना घडल्या आहेत; मात्र अनेक प्रकरणांचा अद्याप छडा लागलेला नसल्याने चोरट्यांचे मनोबल वाढल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. घटनेची माहिती मिळताच हिवरखेड पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पुढील तपास सुरू असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

## स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**मलकापुर :** स्कूल ऑफ स्कॉलर्स, मलकापुर येथे दि. २१ जून २०२६ रोजी १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावर्षी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन माध्यमातून घरबसल्या योगाभ्यास करून योग दिन साजरा केला, तर शिक्षकांनी शाळेत उपस्थित राहून विविध योगासने व प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. सुदीप्ता सरकार या शिक्षकांसह उपस्थित होत्या. तसेच शाळेचे संचालक ॲड.अमर संचेती यांनी ऑनलाइन माध्यमातून कार्यक्रमात सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

योगाचा अंगीकार करून निरोगी जीवन जगण्याचा संकल्प करत हा दिवस साजरा करण्यात



आला. मुख्याध्यापिका डॉ. सुदीप्ता सरकार यांनी उपस्थित शिक्षकांना संबोधित करताना दैनंदिन जीवनात तसेच उत्तम आरोग्यासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित केले व सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात क्रीडा शिक्षिका साक्षी धारस्कर यांनी योग प्रार्थनेने केली. त्यानंतर क्रीडा शिक्षक मनीष उमाळे यांनी सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक सादर करून त्याचे महत्त्व स्पष्ट केले. शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन माध्यमातून विविध योगासनांची उत्कृष्ट प्रात्यक्षिके सादर केली.

यावेळी क्रीडा विभाग प्रमुख स्वप्नील साळुंके यांनी विद्यार्थ्यांना योगाचे फायदे, योग करण्याच्या योग्य पद्धती तसेच नियमित योगाभ्यासामुळे एकाग्रता, बुद्धिमत्ता, प्रतिकारशक्ती आणि शारीरिक विकास कसा होतो याविषयी मार्गदर्शन केले. योगामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक असलेली मानसिक क्षमता, आत्मविश्वास व निर्णयक्षमता वाढण्यास मदत होते, असेही त्यांनी सांगितले.

क्रीडा शिक्षिका साक्षी धारस्कर आणि क्रीडा शिक्षक मनीष उमाळे यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली. तसेच आय.टी विभाग प्रमुख शशांक चौहान,स्मिता शर्मा आणि उमेश ढगे यांनी ऑनलाइन कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष योगदान दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे संचालक ?ड.अमर संचेती यांनी सर्व विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आभार प्रदर्शन क्रीडा विभाग प्रमुख स्वप्नील साळुंके यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक-शिक्षिका व कर्मचारीवृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

## लग्नाचे आमिष दाखवून ४ वर्षे शारीरिक संबंध; दुसरीकडे विवाह केल्याप्रकरणी गुन्हा

प्रतिनिधी २२ जून

**देऊळगाव राजा :** लग्नाचे आमिष दाखवून एका महिलेसोबत साखरपुडा करून तब्बल चार वर्षे शारीरिक संबंध ठेवत अखेर दुसऱ्याच युवतीशी विवाह केल्याप्रकरणी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रुपाली प्रशांत जैन (वय ४०, रा. चिखली रोड, पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, देऊळगाव राजा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून केतन पदमकुमार गिरणीवाले (रा. जुना जालना रोड, देऊळगाव राजा) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ६९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, आरोपीने फिर्यादी महिलेला लग्नाचे आश्वासन देत तिच्यासोबत साखरपुडा केला. त्यानंतर जून २०२२ पासून फेब्रुवारी २०२६ पर्यंत लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवले. मात्र, लग्नाचे आश्वासन पूर्ण न करता आरोपीने दुसऱ्या युवतीशी विवाह केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी फिर्यादीच्या तोंडी तक्रारीवरून २० जून रोजी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस निरीक्षक ब्रम्हागिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन मिंड हे पुढील तपास करीत आहेत.

## कोळसा वाहतूक करणाऱ्या मालगाडीतून धूर, दुर्घटना टळली!

### ♦ नांदुरा रेल्वे स्थानकातील घटनाः प्रशासन सतर्क

प्रतिनिधी २२ जून

**नांदुरा :** येथील रेल्वे स्थानकावर शनिवारी कोळसा वाहतूक करणाऱ्या मालगाडीच्या एका डब्यातून धूर निघत असल्याचे आढळल्याने काही काळ खळबळ उडाली; मात्र रेल्वे प्रशासनाच्या सतर्कतेमुळे कोणतीही जीवितहानी अथवा मोठे नुकसान झाले नाही.

एमएच-५६ प्रादेशिक प्रवासी संघटनेच्या वतीने नेहमीप्रमाणे स्थानकावर प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याचे वाटप सुरू होते. दुपारनंतर गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्स्प्रेसमधील प्रवाशांना पाणी वाटप केल्यानंतर रेल्वे प्रशासनाने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. मागून येणाऱ्या कोळसा वाहतूक करणाऱ्या मालगाडीच्या एका डब्यात आग लागण्याची शक्यता असल्याची माहिती देण्यात आली. आवश्यकतेनुसार पाणी व मनुष्यबळाची मदत लागू शकते, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले.त्यावेळी बहुतेक जलसेवक स्थानकावरून निघून गेले होते; मात्र संघटनेचे अध्यक्ष अशोक घनोकार, सचिव अनुज मुंधडा, तसेच सदस्य आकाश डागा, अमोल चांडक व निमिष शर्मा हे स्थानकावर उपस्थित होते. त्यांनी मालगाडी स्थानकात आल्यानंतर संबंधित डब्याची पाहणी केली. दरम्यान, संबंधित डब्यातील कोळशातून धूर निघत असल्याचे दिसून आले. धूर किंवा संभाव्य आग नेमकी कशामुळे निर्माण झाली, याबाबत रात्री उशिरापर्यंत रेल्वे प्रशासनाकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नव्हती. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाने तातडीने खबरदारी घेतल्याने मोठा अनर्थ टळला.

## उसनवारीचे पैसे मागितल्याच्या वादातून मारहाण

प्रतिनिधी २२ जून

**देऊळगाव राजाः** उसणे दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका शेतकऱ्याला दगडाने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिल साहेबराव चव्हाण वय ३४, रा. गिरोली बु. ह. मु. साईनगर यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यानुसार राहुल अशोक कुसळकर, संतोष रामदास पिटकर, गणेश रामदास पिटकर, राहुल शिवाजी शिंदे व आरती राहुल कुसळकर सर्व रा. गिरोली बु. यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटना १८ जून रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास गिरोली बु. येथे घडली. फिर्यादीने आरोपी राहुल कुसळकर याला त्याच्या मुलाच्या उपचारासाठी ४० हजार रुपये उसने दिले होते. हे पैसे परत मागण्यासाठी फिर्यादी आरोपीच्या घरी गेले असता, आरोपीने पैसे देण्यास नकार देत शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. यावेळी आरोपीने फिर्यादीला धक्काबुक्की करून जवळ पडलेला दगड डोक्यात मारला. या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्याला दुखापत होऊन रक्तस्त्राव झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, संतोष पिटकर, गणेश पिटकर व राहुल शिंदे हे तेथे येऊन त्यांनीही फिर्यादीला चापट-बुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे.भांडण सोडविण्यासाठी फिर्यादीची पत्नी पूजा अनिल चव्हाण व वहिनी शीतल प्रभाकर मुधोळकर या मध्ये पडल्या असता, आरोपी आरती राहुल कुसळकर हिने त्यांनाही शिवीगाळ करून धक्काबुक्की केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात कायम अप. क्र. २७८ २०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १८९ २, ११८ १, ११५ २, ३५२, ३५१ २ व ३५१ ३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ संजय गोरे यांच्या ताब्यात देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, गिरोली बु. येथे १८ जून रोजी झालेल्या याच वादातून दोन्ही पक्षांनी परस्परविरोधी फिर्यादी दाखल केल्या आहे.

## दसरखेड प्राथमिक आरोग्य केंद्रास शिवसेना (उबाठा)ने ठोको इशारा दिल्याच्या धास्तीने तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुरेखा जैन यांचे लेखी पत्र

### ♦ डॉक्टर्स, नर्स, ऐएनएम कर्मचाऱ्यांची तात्काळ नियुक्ती करा अन्यथा ताला ठोकोचा तालुका आरोग्य अधिकारी यांना शिवसेना (उबाठा) ने दिला होता इशारा

प्रतिनिधी २२ जून

**मलकापुरः** 'तालुक्यातील ग्राम दसरखेड येथे नव्याने सुरू झालेले प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर, नर्स,ऐएनएम कर्मचारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात सलाईन, इंजेक्शन आदींची उपलब्धी नसल्याने या प्राथमिक आरोग्य केंद्रात १० ते १२ खेड्यापाड्यावरून येणाऱ्या रुग्णांवर उपचाराची हेडसांड होत असल्याने आरोग्य उपकेंद्रात डॉक्टर व नर्स, कर्मचाऱ्यांची उपलब्धी करा अन्यथा ठताला ठोको आंदोलनठ करण्याचा इशारा शिवसेना सह संपर्क प्रमुख वसंतराव भोजने, उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास सह शिवसेना पदाधिकाऱ्यांनी तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुरेखा जैन यांना दिला होता. ग्राम दसरखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आजूबाजूच्या दहा ते बारा खेड्यापाड्यातून रुग्ण औषधोपचारासाठी येतात मात्र येथे डॉक्टर्स, नर्स, ऐएनएम कर्मचारी उपलब्ध नसल्याने तात्पुरत्या गोळ्या देऊन त्यांची बोळवण केली जाते,पर्यायाने रुग्णांची हेळसांड होऊन आजारी होण्याचं प्रमाण वाढत असल्याने पाच दिवसात तज्ञ डॉक्टर्स, ऐएनएम कर्मचारी, नर्स व आरोग्य उपकेंद्रात इंजेक्शन सलाईनची उपलब्धता करण्यात यावी अन्यथा आरोग्य उपकेंद्राला शिवसेनेच्या वतीने ताला ठोको आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने, उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत,शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, नगरसेवक रफीकभाई बर्तनवाले,किसान सेना उपतालुकाप्रमुख गजानन मेहेंगे, वाहतूक सेना शहर प्रमुख इम्रान लकी, युवा सेना उपजिल्हाप्रमुख शुभम घोंगटे, उपतालुकाप्रमुख अमीत राजपूत,शिवसेना विभाग प्रमुख सत्तार शाह, संतोष दिघे,शंकर कडू, जितेंद्र घोंगटे सह आदींनी दिला होता, शिवसेना (उबाठा)च्या ठताला ठोको आंदोलनाच्याठ इशाऱ्याच्या धास्तीने तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुरेखा जैन यांना वरीष्ठ अधिकाऱ्यांनी तात्पुर्ती कर्मचाऱ्यांची व्यवस्था करून आरोग्यसेवा सुरळीत करण्याबाबत सुचीत केल्याने व दि.२८ जुन २६ पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहीम व्यापक स्वरूपात राबविण्यात येत असल्यामुळे दि. १ जुलै २६ पासून दसरखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेवा व औषध साठा सुरळीत करण्यात येणार असल्याचे लेखी पत्र जा.क्र./ ताआअ/आस्था/ ११३/२६ आज दि.२२ जुन २६ रोजी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना दिल्याने उपकेंद्रास ताला ठोको आंदोलन तुर्तास स्थगित करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. २२ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# गायगाव व भौरदवासीय झाले श्रीचरणी नतमस्तक

## ♦ राजराजेश्वर नगरीत उद्या श्री संत गजानन महाराज पालखीचे जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात सहभागी होण्यासाठी टाळ-मृदंगाच्या निनादात, पारंपरिक वाद्यांच्या गजरात तसेच भगवतधर्माच्या पताका हातात घेऊन सुमारे ७०० हून अधिक वारकऱ्यांसह निघालेल्या श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे अकोला जिल्ह्यात उत्साहात स्वागत होत आहे. रविवारी सायंकाळी पालखीचे पारस येथे आगमन झाल्यानंतर परिसरातील भाविकांनी रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी गर्दी केली.

सोमवारी पहाटे ५ वाजता श्रींचा अभिषेक व पूजन विधी संपन्न झाल्यानंतर पालखी गायगावच्या दिशेने मार्गस्थ झाली. निमकर्दा मार्गे सकाळी ९ वाजता पालखी गायगाव येथील प्राचीन गणेश मंदिर परिसरात दाखल झाली. यावेळी ग्रामस्थांनी पालखीचे भक्तिभावाने स्वागत करून वारकऱ्यांचे आदरातिथ्य केले. दुपारी १२ वाजता पालखीने गावातून भ्रमण करत विश्रांती घेतली.

यावेळी मोठ्या संख्येने भाविकांनी श्रींचे दर्शन घेऊन आराधना केली.त्यानंतर पालखी भौरदकडे रवाना झाली. मार्गात विविध ठिकाणी ग्रामस्थांनी लिंबू सरबत, ताक, मठ्ठा तसेच इतर अल्पोपहाराचे वाटप करून पालखीचे स्वागत केले. सायंकाळी पालखीचा मुक्काम भौरद येथे होणार आहे. दरम्यान, मंगळवारी सकाळी सुमारे ७ वाजता श्री संत गजानन महाराजांची पालखी राजराजेश्वर नगरी अकोल्यात दाखल होणार आहे. अनोखा हनुमान मंदिराजवळ अकोला वारकरी संप्रदायाच्या वतीने पालखीचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर पालखी डाबकी रोडवरील खंडेलवाल विद्यालय येथे विश्रांतीसाठी थांबणार असून भाविकांना श्रींच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. पालखी मार्गावरील प्रत्येक गावात होत असलेले उत्स्फूर्त स्वागत, भक्तिभावाने केली जाणारी सेवा आणि वारकऱ्यांचा अखंड हरिनामाचा गजर यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.

# प्रमाणपत्रांसाठी सेतू केंद्रावर मोठी गर्दी, दलाल ही सक्रिय

## ♦ तासनतास रांगेत उभे राहण्याची वेळ

प्रतिनिधी २२ जून

**अकोला:** इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर उच्च शिक्षणाच्या प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रांकरिता विद्यार्थी आणि पालक सेतू सुविधा केंद्रांवर गर्दी करत आहेत प्रवेशासाठी होणारी गर्दी आणि सेतू केंद्रांवरील लांब लांब रांगांमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे या प्रक्रियेत दलाल हस्तक्षेप करत असल्याच्या तक्रारीही येत आहेत काही ठिकाणी जास्त शुल्क आकारले जात असून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी जात प्रमाणपत्र उत्पन्नाचा दाखला आणि रहिवासी दाखला यासारखी कागदपत्रे अनिवार्य आहेत या प्रमाणपत्रांसाठी सध्या जिल्ह्यातील सेतू केंद्रात बाहेर लांबच लांब रांगा दिसत आहेत जिल्ह्यात तीनशेहून अधिक मान्यताप्राप्त आपले सरकार केंद्रे असूनही



**प्रमाणपत्राचे प्रकार**

| जात प्रमाणपत्र | जुने दर | नवे दर |
| --- | --- | --- |
| | ५८ | १२८ |
| नॉन क्रिमीलेअर | ५८ | १२८ |
| अधिवास प्रमाणपत्र | ३४ | ६९ |
| उत्पन्न प्रमाणपत्र | ३४ | ६९ |
| शपथ पत्र ३४ | ६९ | |
| महिला आरक्षण | ३४ | ६९ |
| शेतकरी प्रमाणपत्र | ३४ | ६९ |
| भूमिहीन प्रमाणपत्र | ३४ | ६९ |
| श्रावण बाळ योजना | ३४ | ६९ |

वाढत्या मागणीमुळे केंद्रांवर मोठा दबाव निर्माण होत आहे पालकांना अनेकदा केंद्रांवर तासनतास थांबावे लागत आहे रांगेत उभे राहूनही काम पूर्ण होत नाही कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तहसील कार्यालय शाळा आणि सेतू केंद्र यांच्यामध्ये विद्यार्थ्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत

# बेरोजगार फसवणूक प्रकरणात मोठे मासे गळाला लागणार !

प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे कायमस्वरूपी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत अकोला आणि जळगाव खान्देशातील अनेक बेरोजगार युवक-युवतींकडून कोट्यवधी रुपये उकळणाऱ्या रॅकेटचे धक्कादायक धागेदोरे समोर येत असून, या प्रकरणात आणखी काही मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाचा तपास करणाऱ्या जुने शहर पोलिसांच्या कारवाईकडे अन्यायग्रस्तांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी स्वाती स्वप्निल जुनगडे (इंगळे) हिला अकोला पोलिसांनी जळगाव न्यायालयातून ताब्यात घेतले असून, चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. सरकारी नोकरीच्या नावाखाली बनावट नियुक्तिपत्रे, मुलाखतीची पत्रे, ओळखपत्रे ताब्यात घेतले. याप्रकरणी जुने शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) व ३३६(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, प्राथमिक तपासात अकोला आणि जळगावसह खान्देशातील अनेक युवक-युवतींची लाखो रुपयांनी फसवणूक झाल्याचे धागेदोरे समोर येत असल्याने हा घोटाळा कोट्यवधींचा असल्याची चर्चा रंगली आहे. तक्रारदार श्रीकांत बाबुराव सरदार (४०) रा. वाशीम बायपास परिसर, अकोला यांच्या पत्नीची ओळख गांधी रोडवरील एका ब्युटी पार्लरमधून स्वाती जुनगडे हिच्याशी झाली होती. स्वतःचे उच्चस्तरीय संपर्क असल्याचा आव आणत तिने पीकेव्हीमध्ये लिपिक पदावर कायमस्वरूपी नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. विश्वास संपादन करत मूळ कागदपत्रांसह टप्प्याटप्प्याने लाखो रुपयांची मागणी करण्यात आली. मार्च २०२५ पासून बँक व्यवहार, आरटीजीएस आणि फोन-पेच्या माध्यमातून गोठी रक्कम स्वीकारण्यात आली. एवढेच नव्हे तर पीकेव्हीच्या नावाने बनावट नियुक्ती आदेश, कथित मुलाखतपत्र, ओळखपत्र तसेच सेवा पुस्तिका तयार करून अधिकृत प्रक्रियेचा भास निर्माण करण्यात आला होता. नियुक्तिपत्रे, सेवा पुस्तिका आणि इतर दस्तावेज तयार करण्यामागे आणखी कोणाचा हात आहे? सरकारी कार्यालयांतील काही व्यक्तींचे पाठबळ होते का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. तपासाची व्याप्ती वाढत असून, आगामी काळात या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वैद्यकीय तपासणी, अंतिम मुलाखत आणि आचारसंहितेचे कारण पुढे करत नियुक्ती प्रक्रिया वारंवार लांबविण्यात आली. अखेर पीडितांनी थेट पीकेव्ही प्रशासनाकडे चौकशी केली असता, सर्व कागदपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट झाले आणि फसवणुकीचा भंडाफोड झाला. हे प्रकरण आणखी कोणावर शेकणार याकडे लक्ष आहे.

# राजपूतपुरा भागातील मोठ्या नाल्याची स्वच्छता आता सुरू

## ♦ नाल्यातील कचरा बाजूलाच टाकल्यामुळे अस्वच्छता



प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** पावसाला उशीर झाला म्हणून बरे नाही तर शहरातील नाल्यांची स्वच्छता तशीच राहिली असती. राजपूतपुरा आणि देवरावबाबा चाळीच्या मधून वाहणाऱ्या मोठ्या नाल्याची स्वच्छता आज सकाळ पासून सुरू केली आहे. गेली कित्येक वर्षे याकडे लक्ष नाही. आजुबाजूला झाडे वाढली. त्यामुळे रहिवाशांची गैरसोय होत आहे.

पावसाळ्यापूर्वी नाले, नाल्यांची स्वच्छता करण्यात यावी अशी मागणी होती. मात्र आता जून संपत आला तरी नाले सफाई सुरू आहे. तसेच स्वच्छता कामे देखील व्यवस्थित होत नाही अशी ओरड होत आहे. नाल्यांमधील कचरा तिथेच टाकला जातो. वेळीच कचरा उचलला नाही तर रस्त्यावर घाण पसरते. तसेच आजुबाजूच्या लोकांना त्याचा त्रास होतो. त्यामुळे एकावेळी व्यवस्थित कामे करावी अशी मागणी आहे.

# विदर्भ माध्यमिक शिक्षक संघातर्फे गुरुवारी धरणे व निदर्शने आंदोलन

प्रतिनिधी २२ जून

**यवतमाळ :** राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने पावसाळी अधिवेशनादरम्यान संघटनेचे सरकार्यवाह तथा आमदार श्री. सुधाकर अडबाले व माजी आमदार व्हि. यू. डायगव्हाणे यांच्या नेतृत्वात गुरुवार, दि. २५ जून २०२६ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक (नागपूर/ अमरावती) कार्यालयासमोर व विदर्भातील सर्व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर धरणे व निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे. राज्यातील खाजगी, स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, खाजगी अनुदानित शाळा, विजाभज तसेच आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनात राज्यातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करणे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर १०० टक्के अनुदान मिळालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना देणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीवरील बंदी उठविणे, शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरणे, शाळांना सातव्या वेतन आयोगावर आधारित १०० टक्के वेतनेत्तर अनुदान देणे, तसेच शिक्षकांना १०-२०-३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करणे अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. याशिवाय नक्षलग्रस्त भागात कार्यरत शिक्षक व कर्मचाऱ्यांना १५% नक्षल ग्रस्त भत्ता देणे, अंशतः अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा व इतर सेवा लाभ देणे, विद्यार्थ्यांच्या हितासाठी २० पटाखालील शाळा बंद न करण्याची मागणी, तसेच शिक्षकांचे निवृत्ती वय ६० वर्षे करणे, संगीत शिक्षकांच्या मागण्या मंजूर करणे तसेच शिक्षण क्षेत्राशी संबंधित एकूण ४० मागण्यांना घेऊन आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनात विदर्भातील सर्व जिल्ह्यांतील संघटनेचे प्रांतीय पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, जिल्हा कार्यवाह तसेच शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आव्हान विमाशी संघटनेचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, जयकुमार सोनखासकर, विजय ठोकळ, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहागंडाले, बाळासाहेब गोटे, कोषाध्यक्ष भूषण तल्हार तसेच जिल्हा, महानगर, तालुका पदाधिकारी यांनी केले आहे.

# अनिता मेश्राम यांना निरोप ; अनय नावंदर यांचे स्वागत

प्रतिनिधी २२ जून



**अकोला :** जिल्हा परिषदेच्या संविधान भवनात सायंकाळी भावनांनी ओथंबलेला आणि उत्साहाने भारलेला अविस्मरणीय सोहळा पार पडला. एका बाजूला संवेदनशील मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांना निरोप तर नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांचे जिल्हा परिषदेत आगमन होताच नगारांच्या गजराने, टाळ्यांच्या कडकडाटाने परिसर दुमदुमून गेला. संविधान भवन परिसर आकर्षक रोषणाई व फुग्यांच्या सजावटीने सजला होता. निरोप समारंभात वक्त्यांनी अनिता मेश्राम यांच्या कार्यकाळाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांची आयुक्त, मनरेगा नागपूर या महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती झाल्याने उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. अकोला जिल्हा परिषद माझ्यासाठी केवळ कार्यालय नव्हते. येथील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक माझ्या कुटुंबाचा भाग बनला. अकोल्याच्या मातीने मला खूप काही दिले आहे. येथे मिळालेला स्नेह आणि विश्वास मी आयुष्यभर जपून ठेवेन असे अनिता मेश्राम म्हणाल्या. अनय नावंदर यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन रविदास भोयर यांनी केले.




# दुर्गा चौकातील नाल्यावरील रपट्याचे काम संथगतीने !

प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** शहरातील मुख्य चौक असलेल्या दुर्गा चौकातील नाल्यावर रपटा टाकण्याचे काम अनेक दिवसांपासून सुरू आहे. त्यामुळे या मार्गावरून नियमित प्रवास करणाऱ्या या भागातील रहिवाशांना फेऱ्याने प्रवास करावा लागतो. आधीच या रपट्याचे काम ऐन पावसाळ्याच्या तोंडावर सुरू केल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले होते. आता त्या कामाची गती पाहून नागरिकांमध्ये व व्यावसायिकांमध्ये नाराजीचा सूर उमट आहे. कारण पावसाला केव्हा सुरूवात होईल, याचा नेम नसल्याने या रपट्याचे काम आणखी रेंगाळण्याची शक्यता नाकारता येत नाही.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK